cmyk

## संपादकीय

### मान्सूनची खुश खबर !

राज्यात उन्हाळ्याचा कडाका अस झाला आहे. काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे तापमानाचा पारा खाली आल्याने नागरिकांना थोडासा का होईना दिलासा मिळाला. दरम्यान अंदमान–निकोबार बेटांवरून मान्सूनबाबत खुशखबर आली आहे. यंदा वेळेआधीच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने यंदा १०५ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला असून केरळमध्ये १ जूनला तर मुंबईसह महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर ८ जूनपर्यंत मान्सून धडकण्याची शक्यता आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पुणे विमानतळावरून १३ उड्डाणे रद्द !

पुणे : 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत पाकिस्तानमधील काही शहरांवर केलेल्या एअर स्ट्राइकनंतर उत्तरेकडील काही महत्त्वाच्या विमानतळांवरील नागरी उड्डाण सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. यामुळे पुणे विमानतळावरून होणाऱ्या काही उड्डाणांवर परिणाम झाला असून, गुरुवारी विविध मार्गांवरील १३ विमान सेवा रद्द करण्यात आल्या आहेत. पुणे विमानतळ प्रशासनाने यासंदर्भात दिलेल्या माहितीनुसार गुरूवारी (दि. ८) १३ मार्गांवरील इंडिगो, स्पाइसजेट विमानसेवा रद्द करण्यात आली आहे. या अचानक झालेल्या बदलामुळे अनेक प्रवासी प्रभावित झाले असून, त्यांना याची कल्पना देण्यासाठी विमानतळ प्रशासन, विमान कंपन्या आणि अन्य संबंधित यंत्रणा तत्पर झाल्या आहेत.

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–१९ शुक्रवार, दि.९ मे २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

# इथेनॉल निर्मितीसाठी अतिरिक्त २८ लाख टन तांदळाला मंजूरी

## तांदळाचा एकूण वापर ५२ लाख टनांवर पोहचला, सुमारे २४५ कोटी लिटर इथेनॉलची निर्मिती

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्र सरकारने २०२४–२५ साठी २८ लाख टन अतिरिक्त तांदूळ इथेनॉल निर्मितीसाठी वापरास मंजूरी दिली आहे. त्यामुळे २०२४–२५ (नोव्हेंबर ते ऑक्टोबर) वर्षात इथेनॉल निर्मितीसाठी तांदळाचा वापर ५२ लाख टनांवर पोहचला आहे. परंतु इथेनॉलसाठी वापरण्यात येणाऱ्या तांदळाच्या किमती जैसे थे ठेवण्यात आल्या आहेत.**



इथेनॉल निर्मितीसाठी महामंडळ तांदळाच्या वाटपाला सक्षम प्राधिकरणाने मंजुरी दिल्याचे अन्न मंत्रालयाने मागील आठवड्यातच अधिसूचनेत स्पष्ट केले होते. तसेच हा तांदूळ ठराविक दराने म्हणजेच २२.५० रुपये प्रतिकिलो दराने दिला जाणार आहे. यामध्ये २४ लाख टन पूर्वीचा तर २८ लाख टन नव्याने मंजूर केलेल्या तांदळाचा समावेश आहे. म्हणजेच एकूण ५२ लाख टन तांदूळ इथेनॉल निर्मितीसाठी मंजूर करण्यात आला आहे. या तांदळाचा वापर १ नोव्हेंबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ च्या दरम्यान करण्यात येणार आहे. त्यासाठी भारतीय अन्न महामंडळामार्फत उपलब्ध होणाऱ्या तांदळाच्या साठ्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचं अन्न मंत्रालयाने सांगितले आहे. इथेनॉल निर्मितीसाठी तांदळाचे दर प्रतिकिलो २२.५० रुपये कायम ठेवण्यात आले आहेत. तर भारतीय अन्न महामंडळाने यापूर्वी २४ लाख टन तांदूळ इथेनॉल निर्मितीसाठी कंपन्यांना मंजूर केला होता.

पान २ वर

### "सरकारला १० हजार कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागणार

भारतीय अन्न महामंडळाच्या एक टन तांदळापासून ४७० लिटर इथेनॉल तयार होण्याचे गृहीत धरले. तर ५२ लाख टन तांदळापासून सुमारे २४५ कोटी लिटर इथेनॉल तयार होऊ शकते. त्यासाठी सरकारला १० हजार कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागणार आहे. तसेच २०२५–२६ मध्ये तांदळाचा प्रतिकिलो अंदाजे खर्च ४१.७३ किलो आहे. तर इथेनॉल निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या तांदळाचे दर प्रतिकिलो २२.५० रुपये निश्चित करण्यात आले आहेत. म्हणजे सरकारला प्रतिकिलो १९.२३ रुपये अनुदान द्यावे लागणार आहे.

## नक्षलवादी हल्ल्यात पाच जवान शहीद ; ८ नक्षलींचा खात्मा

**गडचिरोली । वृतसंस्था**

**छत्तीसगड– तेलंगण सीमेवरील करेगुट्टा येथील नक्षलविरोधी मोहिमेदरम्यान पाच जवान शहीद झाले. वाझेड येथे नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोट घडवला आणि यात पाच जवान शहीद झाले. यानंतर सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली असून या चकमकीत ८ नक्षलींचा खात्मा करण्यात आला आहे.**



गडचिरोलीपासून जवळपास ५० किलोमीटर अंतरावर असलेली आणि छत्तीसगड– तेलंगण सीमेवरील करेगुट्टा पर्वतरांग म्हणजे नक्षलवाद्यांचे आश्रयस्थान. २१ एप्रिलपासून सुरक्षा दलांनी नक्षलींचे हे तळ उद्ध्वस्त करण्यासाठी मोहीम सुरू केली होती. गुरुवारी वाझेड–व्यंकटपूरम या भागात तेलंगण पोलीस आणि सुरक्षा दलाचे जवान यांचे पथक कोम्बिंग ऑपरेशन राबवत होते. यादरम्यान नक्षलींनी आयईडी स्फोट घडवला. त्यानंतर सुरक्षा दलांवर गोळीबार देखील करण्यात आला. यात आठ जवान


पान २ वर

# ऑपरेशन सिंदूर सुरूच!

## गुरूवारी १२ ठिकाणी नव्याने हल्ले; केंद्र सरकारने बोलाविलेल्या सर्वपक्षिय बैठकीत दिली ऑपरेशन सिंदूरची माहिती, काँग्रेससह सर्वपक्षियांचा पाठिंबा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भारत–पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर गुरूवार दि. ८ मे रोजी बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीत देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले की, पाकिस्तानविरुद्ध 'ऑपरेशन सिंदूर' अजूनही सुरू असूच तूर्तास कारवाई सुरूच राहणार आहे. म्हणजेच ७ मे रोजी पाकिस्तानातील ९ ठिकाणी झालेल्या हवाई हल्ल्यानंतरही कारवाई थांबलेली नसून गुरूवारी १२ ठिकाणी नव्याने हल्ला करण्यात आला आहे.**



दिल्लीतील संसदेच्या कक्षात बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत संरक्षणमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही संरक्षणमंत्र्यांच्या विधानाचा पुनरुच्चार केला असून 'ऑपरेशन सिंदूर' सुरूच असल्याचे

पान २ वर

### विशेष अधिवेशन बोलवा

मल्लिकार्जून खर्गे पुढे बोलताना म्हणाले की, सरकारने आम्हाला सर्व प्रकारची पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच राहुल गांधी यांनी संसदेचे अधिवेशन बोलावण्याची मागणी केली, जेणेकरून बाहेर चांगला संदेश जाईल, जर अधिवेशन बोलावले तर खासदार त्यांचे विचार मांडू शकतात आणि लोकांचा विश्वास वाढवू शकतात. पण सरकारने याबाबत कोणतेही आश्वासन दिले नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### भारताच्या हल्ल्यात रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम उद्ध्वस्त

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव तिव्र झाला आहे. पाकिस्तानने भारतातील १५ शहरांवर क्षेपणास्त्र हल्ले केले, परंतु भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतच पाकिस्तानी क्षेपणास्त्र हल्ले हाणून पाडले. आता भारताने पाकिस्तानच्या रावळपिंडी स्टेडियमवर हल्ला करून ते स्टेडियम उद्ध्वस्त केले आहे. पाकिस्तान सुपर लीग २०२५ सध्या पाकिस्तानमध्ये आयोजित केली जात होती, जिथे ८ मे रोजी रावळपिंडीच्या मैदानावर पेशावर झल्मी आणि कराची किंग्ज यांच्यात सामना होणार होता. पण आता भारताने ड्रोन हल्ल्याद्वारे स्टेडियम उद्ध्वस्त केले या कारणास्तव, येथे होणारा सामना रद्द करण्यात आला.


## पाकिस्तानच्या सर्व कंटेंटवर भारतात बंदी!

### केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**दिल्ली । वृतसंस्था**

**भारत पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पाकिस्तानात तयार होणाऱ्या सर्व प्रकारच्या डिजिटल कंटेंटवर बंदी घालण्याचे आदेश केंद्राने दिले आहेत. केंद्र सरकारने ओटीटी, मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मना गुरूवारी (दि.८) महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत.**

२२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमध्ये झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर सुरक्षा उपाययोजनांच्या मालिकेतील



नवीनतम घटना म्हणजे, सरकारने गुरुवारी (दि.८) ऑनलाइन स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मना सर्व मूळचा पाकिस्तानी कंटेंट ताबडतोब बंद करण्याचे निर्देश दिले. भारत–पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सुरक्षेच्या हितासाठी भारताने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशात, ''भारतातील सर्व ओटीटी प्लॅटफॉर्म, मीडिया स्ट्रीमिंग सेवा आणि भारतात कार्यरत असलेल्या मध्यस्थांना निर्देश देण्यात आले आहेत. सबस्क्रिप्शनआधारित मॉडेलसद्वारे किंवा इतर कोणत्याही प्रकारे ऑफर केलेले पाकिस्तानी वेब सिरीज, चित्रपट, गाणी, पॉडकास्ट आणि पाकिस्तानमधून येणारे इतर स्ट्रीमिंग कंटेंट ताबडतोब बंद करण्यास सांगितले आहे.'' ''राष्ट्रीय सुरक्षेच्या हितासाठी'' हा निर्णय घेण्यात आला आहे, असे अधिसूचनेत म्हटले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील वाढत्या

पान २ वर

## खोट्या आरटीओला बनावट गाडीसह पकडले

### स्थानिक गुन्हे शाखा बीडची उल्लेखणीय कामगिरी, एकूण साडे अकरा लाखांचा मुद्देमाल जप्त



**बीड । पतिनिधी**

**बीडच्या बायपासवर आरटीओ यांच्या वाहनासारख्या दिसणाऱ्या वाहनासह आरटीओ बनावट गणवेश परिधान केलेल्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहाथ पकडले. खासगी वाहनांना अडवून त्यांच्याकडून पैशाची वसुली केली जात होती. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. हे दोनही आरोपी मुंबई येथिल राहणारे आहेत.**

बीडचे आरटीओ गणेश जयराम विघ्ने यांनी पो.स्टे.बीड ग्रामीण येथे फिर्याद दिली की, बीड बायपास रोड येथे दोन ईसम गणवेश धारण करुन परिवहन विभागाचे लोगो व कार्यालयात वापण्यात येणाऱ्या हुबेहूब दिसणाऱ्या स्कॉर्पीओ वाहनाचा वापर करुन खोटा लोकसेवक असल्याचा बनावा करुन

पान २ वर

## ओबीसी समाज जास्त आरक्षण घेत होता!

### जातनिहाय जनगणनेवर मनोज जरांगेंचे मोठे विधान

**जालना । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या जातनिहाय जनगणना या निर्णयाचे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी स्वागत केले आहे. ओबीसी समाज जास्त आरक्षण घेत होता. जातनिहाय जनगणनेने खरा आकडा समोर येऊन मराठ्यांना आरक्षण मिळेल, आमच्या पोरांचे कल्याण होईल, असे जरांगे म्हणाले.**

जातनिहाय जनगणनेच्या फॉर्मवर कुणबी लिहायला लाज वाटणार नसल्याची प्रतिक्रिया मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिली. त्याचबरोबर मराठा आणि कुणबी एकच आहे. त्यामुळे जातनिहाय जनगणनेच्या अर्जावर कुणबी लिहायला लाज वाटणार

पान २ वर

## जलसंपदा विभागाची महामंडळे स्वायत्त होणार–मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील जलसंपदा विभागाची महामंडळे स्वायत्त करण्यात येणार आहेत. त्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी (दि.८) पुण्यातील सिंचन भवन येथे नियामक मंडळाची



पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: १०४.०० क्विंटल | | |
| २,४२१ | २,९५५ | २,७०१ |
| ज्वारी/हायब्रिड:१३३.०० क्विंटल | | |
| १,७०० | २,७३१ | २,१८७ |
| मका/लोकल:९.५० क्विंटल | | |
| २,१०० | २,१०० | २,१०० |
| तूर : १५.०० क्विंटल | | |
| ६,१०० | ७,००० | ६,५७० |
| उडीद : १.०० क्विंटल | | |
| ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ८५.५० क्विंटल | | |
| २,००० | २,७०० | २,४०० |
| मुग :४.५० क्विंटल | | |
| ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ६३.५० क्विंटल | | |
| ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | | |
| ५,४०० | ५,६०० | ५,४४० |


# दोन्ही राष्ट्रवादीचे लवकरच मनोमिलन!

## एकत्र येण्यावर शरद पवारांचे संकेत, सुप्रिया सुळेंवर सोपवली जबाबदारी

**पुणे । प्रतिनिधी**

**पक्षातील काही नेते आणि कार्यकर्ते अजित पवार यांच्यसोबत जाण्यास उत्सुक आहेत. हे राजकीय गणित आहे, पण अंतिम निर्णय सुप्रिया सुळे यांनी घ्यावा. त्यांच्यावर पक्षाच्या भवितव्याची मोठी जबादारी आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष शरद पवार यांनी केलेल्या विधानाने चर्चांना उधान आले आहे. यासोबतच पक्षाने सत्तेत सहभागी व्हायचे की विरोधी बाकांवर राहायचे हा निर्णय खासदार सुप्रिया सुळे यांनी घ्यावा, असे देखील शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे. एका इंग्रजी वाहिनीला दिलेल्या मुलाखती दरम्यान शरद पवार यांनी केलेल्या विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा केली जात आहे.**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जुलै २०२३ मध्ये फुटला. पक्षाचे दोन गड पडले. अजित पवार यांच्यासोबत ४० आमदार गेले. या आमदारांसह अजित



पवार महायुती सरकारमध्ये सामील झाले. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार) आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) असे दोन गट निर्माण झाले. खासदार सुप्रिया सुळे एकत्र येण्यासंदर्भात सुप्रिया आणि अजित यांनी बसून ठरवावे. पक्ष उभा करताना आज बाजूला गेलेले सगळे एकत्र होते, त्यांच्या सगळ्यांची विचारधारा एकच आहे, त्यामुळे भविष्यात जर हे सगळे एकत्र आले तर मला आश्चर्य वाटणार नाही, असे शरद पवार यांनी केलेल्या विधानामुळे पुन्हा एकदा राजकीय भूकंप होणार असल्याचे बोलले जात आहे. शरद पवार यांनी केलेल्या विधानामुळे भाकरी फिरवणार असल्याची चर्चा केली जात आहे. माझे सगळे खासदार एका मताचे आहेत, आमदारांमध्ये अस्वस्थता असू शकते, मी निर्णय प्रक्रियेपासून खूप लांब आहे,

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मान्सूनची खुश खबर !

राज्यात उन्हाळ्याचा कडाका अस झाला आहे. काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे तापमानाचा पारा खाली आल्याने नागरिकांना थोडासा का होईना दिलासा मिळाला. दरम्यान अंदमान-निकोबार बेटांवरून मान्सूनबाबत खुशखबर आली आहे. यंदा वेळेआधीच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने यंदा १०५ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला असून केरळमध्ये १ जूनला तर मुंबईसह महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर ८ जूनपर्यंत मान्सून धडकण्याची शक्यता आहे. एल निनोचा प्रभाव नसल्याने अनुकूल वातावरणामुळे पावसाचे प्रमाण चांगले राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटे आणि अग्नेय बंगालच्या उपसागरात मे महिन्याच्या तिसऱ्या आठवडाअखेर मान्सूनपूर्व वातावरण तयार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कमी दाबाचा पट्टा लवकर तयार होईल, त्यामुळे मान्सूनच्या प्रगतीला वेग येऊ शकतो. यंदा महाराष्ट्रात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. तर मध्य महाराष्ट्रात सामान्य पाऊस होईल असा अंदाज आहे. उत्तर गोलार्धात यंदा कमी हिमवृष्टी झाल्याने मान्सूनला पोषक वातावरण आहे. मुंबईत मान्सूनचा पाऊस साधारणपणे जूनच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होतो.

यंदा हवामान विभागाने ७ ते ८ जून दरम्यान मुंबईत मान्सूनच्या पावसाला सुरुवात होण्याची शक्यता वर्तवली आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही जास्त पावसामुळे खरीप पिकांना फायदा होईल तसेच धरणे आणि जलाशयांची पाणी साठवणूक वाढेल असा अंदाज आहे. राज्याच्या काही भागात सध्या अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. सोमवारी बीड जिल्ह्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले. दुपारनंतर जिल्ह्यातील बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी आणि केज तालुक्यांत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. अनेक ठिकाणी गारपीट झाली. परिणामी काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. हिंगोली जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात वादळी वारे, अवकाळी पाऊस यासह काही ठिकाणी गारपीट झाली. याचा फटका मोठ्या प्रमाणात केळीच्या बागांना बसला. राज्यात पुढील चार-पाच दिवसांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. वादळ आणि अवकाळी पावसामुळे ब-याच ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. आंबा, मोसंबी, डाळिंब या फळबागांसह इतर पिकांना अवकाळी पावसासह गारपिटीचा फटका बसला. शेतशिवारामध्ये तीळ, ज्वारी, भुईमूग, भाजीपाला फुलशेती आहे. यातील तीळ, ज्वारी आणि भुईमूग ही पिके काढणीच्या अवस्थेत आहेत.

अवकाळी पावसाने या पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यातील काही ठिकाणी कमाल तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअस पार गेला आहे. विदर्भात ४२ ते ४४ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले आहे. राज्यातील तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. उष्णतेच्या झळांनी विविध जिल्ह्यांत नागरिक अक्षरश: हैराण झाले आहेत. घराबाहेर पडताना धडकी भरेल एवढे तापमान राज्यभरात नोंदवले जात आहे. त्यामुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे. वाढत्या औद्योगीकरणामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. यातूनच कडाक्याची थंडी, प्रचंड उष्णता वाढताना दिसून येते. गत दोन दशकांच्या तुलनेत यंदा ५ ते ७ अंश सेल्सिअसने तापमान वाढल्याचे दिसून येते. याचा सजीव सृष्टीवर विपरीत परिणाम होत आहे. पर्यावरणाचे संरक्षण व्हावे यासाठी आता प्रत्येकानेच वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करण्याची वेळ आली आहे. असे केले तरच वाढत्या तापमानाला आळा बसू शकेल आणि सजीव सृष्टीही वाचविणे शक्य होईल.

यंदा फेब्रुवारीपासूनच राज्यात कडक उन्हाळा सुरू झाला. थंडी कमी आणि ऊन जास्त असे वातावरण होते. त्यामुळे सुमारे शंभर वर्षांतील सर्वांत उष्ण फेब्रुवारी महिना ठरला. त्यानंतर मार्च आणि एप्रिल महिन्यांनी त्याचीच री ओढली. म्हणून गत अनेक वर्षांतील यंदाचा एप्रिल उष्ण ठरला आहे. हे वातावरण मान्सूनच्या तयारीसाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक असे आहे. यंदा खूप कडक उन्हाळा आहे. त्यामुळे बाष्पीभवनाचा वेगही जास्त आहे. ढगांची निर्मिती वेगाने होते आहे. म्हणजेच मान्सून आपल्या तयारीला लागला आहे असे दिसते. बाष्प मोठ्या प्रमाणावर तयार होत असल्याने काही ठिकाणी मान्सूनपूर्व पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. मान्सूनच्या हालचाली समुद्रातील पाण्याचे तापमान, वाऱ्याची दिशा, हवेचा दाब यावर अवलंबून असतात. सध्या अरबी समुद्रातील तापमान ३१ तर हिंदी महासागराचे तापमान ३० अंश सेल्सिअस इतके आहे. पाणी खूप तापल्याने वेगाने बाष्पीभवन होत आहे. देशातील हवेचा दाब कमी झाला की समुद्राकडून देशाच्या दिशेने वारे वाहू लागतात. अंदमानात त्याची झलक दिसू लागली आहे. तेथे मान्सूनच्या हालचाली लवकर होत असल्याचे जाणवते आहे. त्यामुळे यंदाचा मान्सून वेळेआधीच केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.

# सद्गुरू बंकट स्वामी महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

नेकनूर । प्रतिनिधी

**सद्गुरू बंकट स्वामी महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले तसेच लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम बंकट स्वामी महाराज यांनी केले. असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**





श्री क्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाला भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, संभाजी महाराज आगळे, भास्कर महाराज शिंदे, ह.भ.प.स्वामी प्रकाशानंद गिरी महाराज, ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, दिनकर कदम, अरुण डाके. विलास बडगे, नानासाहेब काकडे, भारत काळे, राजाभाऊ शेळके, सखाहरी गदळे, महेंद्र फुटाणे, बाजीराव काळे, गणेश पाटील, अभिमान शिंदे, राजाभाऊ शेळके, पोपट मते, चक्रधर शिंदे, अभिमन्यू काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रीक्षेत्र नेकनूर येथे सुरू असलेल्या संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त केले पुढे बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्रात काकडा भजन, किर्तन परंपरेला समृद्ध करण्याचे श्रेय संत बंकस्वामी महाराज यांना जाते त्यांनी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे २४ वर्ष अध्यक्षपद भूषवले. लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम बंकट स्वामी महाराज यांनी केले. संत वामन भाऊ, संत भगवान बाबा यांना घडवण्याचे काम बंकट स्वामी महाराजांनी केले. स्वातंत्र्याच्या अगोदर बहुजनातील सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना सांप्रदायाचा कीर्तन भजनाचा अधिकार दिला व जाती तोडा आणि समाज जोडा हा मोलाचा संदेश बंकट स्वामी महाराजांनी दिला. बंकट स्वामी संस्थांचा आज विकास होत आहे यात खारीचा वाटा म्हणून जो काही हातभार लावता येतो तो मी नेहमी संस्थानचा भक्त या नात्याने कायम सेवेत राहील असेही ते म्हणाले. यावेळी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### इथेनॉल निर्मितीसाठी अतिरिक्त २८

परंतु इथेनॉल उत्पादक कंपन्यांनी आतापर्यंत त्यापैकी १० टनांपेक्षा कमी तांदूळ उचलला आहे. केंद्र सरकारने यंदाच्या इथेनॉल उत्पादन वर्षात पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रण १८ टक्क्यांच्या पुढे घेऊन जाण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. पुढील वर्षासाठी तर यामध्ये २ टक्के वाढ म्हणजे २० टक्क्यांपर्यंत पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणाचे निश्चित करण्याचा सरकारचा मानस आहे. यंदाच्या इथेनॉल निर्मिती वर्षात नोव्हेंबर ते एप्रिल दरम्यान इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण १८.५ टक्क्यांपेक्षा जास्त नोंदवले गेले आहे. जर इथेनॉल उत्पादक कंपन्यांनी ५२ लाख टन तांदूळ उचलला तर त्यासाठी कंपन्यांना भारतीय अन्न महामंडळाला ११ हजार ७०० कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. तर इथेनॉल तेल कंपन्यांना विकून त्यातून कंपन्यांना अंदाजे १४ हजार ३०० कोटींचे उत्पन्न होण्याची अपेक्षा आहे.

------------

### ऑपरेशन सिंदूर

रिजिजू यांनी म्हटले आहे. ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे उपस्थित होते. बैठकीपूर्वी काँग्रेसने पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीची मागणी केली होती. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, या संकटात आम्ही देश आणि सरकारसोबत आहोत. राहुल गांधी म्हणाले, आम्ही सरकारला पूर्ण पाठिंबा दिला आहे. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले त्याप्रमाणे, त्यांनी (सरकारने) म्हटले की काही गोष्टी आहेत ज्यांवर आपण चर्चा करू इच्छित नाही. एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी म्हणाले ऑपरेशन सिंदूरसाठी मी आपल्या सशस्त्र दलांचे आणि सरकारचे कौतुक केले आहे. आपण रेझिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेविरुद्ध जागतिक मोहीम सुरू केली पाहिजे. गेल्या बैठकीत, सरकारने पहलगाम हल्ल्यात सुरक्षेत त्रुटी असल्याचे मान्य केले होते १३ दिवसांपूर्वी घडले सर्वपक्षीय बैठकीत, केंद्र सरकारने पहलगाम हल्ल्यात सुरक्षेत त्रुटी असल्याचे मान्य केले होते. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले होते की, आयबी आणि गृह मंत्रालयाच्या अधिका-यांनी बैठकीत सुरक्षेतील त्रुटींबद्दल विरोधी नेत्यांना माहिती दिली. खरगे म्हणाले आम्ही म्हणालो की तिथे तीन-स्तरीय सुरक्षा आहे, मग सुरक्षेत चूक कशी झाली? एक हजार लोक तिथे पोहोचले होते. हे सुरक्षेचे अपयश आणि गुप्तचर यंत्रणेचे निष्काळजीपणा आहे. दहशतवादी हल्ला झाला, सरकारला जलद आणि जलद कारवाई करावी लागली, जी झाली नाही. सर्व नेत्यांनी एकत्रितपणे सांगितले की, सरकार देशाच्या हितासाठी जो काही निर्णय घेईल, आम्ही त्यांच्यासोबत आहोत. या मुद्यावर आपण सर्वजण एक आहोत.

------------

### नक्षलवादी हल्ल्यात पाच जवान

जखमी झाले होते. त्यांना तातडीने उपचारासाठी हैदराबाद आणि वारंगल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील पाच जवानांचा उपचारादरम्यान निधन झाले. हल्ल्यानंतर झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी आठ नक्षलींचा खात्मा केला. या चकमकीत सीसी सदस्य चंद्राणा आणि एसझेडसीएम बंदी प्रकाश यांच्यासह एकूण ८ नक्षलवादी ठार झाल्याचे सांगण्यात आले.

--------------

### खोट्या आरटीओला बनावट

लोकांकडुन पैसे वसुल करीत आहेत. या तक्रारीवरुन पो.स्टे.बीड ग्रामीण येथे दोन अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हयाची नोंद झाली होती. वरील गुन्हयांतील आरोपींचा शोध घेण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी पो.नि.उस्मान शेख यांना निर्देश दिले होत. त्यावरुन पो.नि.स्था.गु.शा. यांनी पोउपनि तुळशिराम जगताप यांच्या पथकास तात्काळ पाचारण करुन आरोपीचा शोध घेण्यासाठी मार्गदर्शन केले. गोपनिय माहितीद्वारे आरटीओ यांच्या सारखीच पुर्णपणे दिसणारी गाडी पोलीसांनी दोन आरोपीसह ताब्यात घेतली. त्यातील एकजण हा आरटीओच्या गणवेशात दिसुन आला. त्याच्या टोपीवर मपोसे नावाचा बॅच लावलेला होता. तर उजव्या खांद्यावर दोन स्टार व डाव्या खांद्यावर एक स्टार तसेच दोन्ही खांद्यावर मपवि (महाराष्ट्र परिवहन विभाग) असे बॅच लावलेले होते. त्या दोघांकडे विचारपुस केली असता त्यांनी आम्ही वडाळा येथे नेमणुकीस असल्याचे सांगितले. पोलिसांनी अधिक चौकशी सुरू केल्यानंतर त्यातील एकजण पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला मात्र पोलिसांनी त्याला लागलीच पकडले. त्यांनी पोलिसांना अजय बालाजी गाडगे वय २४ वर्षे, रा.अम्रत नगर, घाटकोपर मुंबई आणि दिनेश मंगल धनसर वय ३८ वर्षे रा. कलीना मुंबई असे सांगितले. अजय गाडगे म्हणाला की, तो कोणत्याही शासकीय पदावर कार्यरत नाही, मागील १० दिवसांपुर्वी पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी विकत घेतली होती, सदर स्कॉर्पिओ वाहनाला हुबेहूब आर.टी.ओ. कार्यालयात वापरात येणाऱ्या वाहनासारखे बनविले व आर.टी.ओ. सारखे कपडे घातले आणि आपल्या भाऊजी सोबत दोन दिवसांपासुन नाशिक, शिर्डी, अहिल्यानगर व बीड येथे वाहने आडवून, आर.टी.ओ. असल्याचे भासवत वाहन धारकांकडून पैशांची वसुली केली. सदर आरोपीकडून रोख ४३ हजार, चार मोबाईल, एक स्कॉर्पीओ वाहन असा एकूण ११,५८, हजार रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना पो.स्टे.बीड ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आलेले असुन पुढील तपास पो.स्टे.बीड ग्रामीण करीत आहेत. सदरची कामगिरी पोलिस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, स्थागुशाचे पो.नि. उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा.बीड पथकातील ग्रेपोउपनि तुळशिराम जगताप, पोह/मनोज वाघ, कैलास ठोंबरे, विकास वाघमारे चालक पोह/शिवाजी खवतड व गणेश विघ्ने मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,बीड यांनी मिळून केली आहे.

------------

### पाकिस्तानच्या सर्व कंटेंटवर

तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी छावण्यांवर हल्ला केल्यानंतर एका दिवसानंतर सरकारचे हे निर्देश आहेत.

**यापूर्वी १५ हून अधिक पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवर बंदी**

यापूर्वी, भारताने १५ हून अधिक पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवर बंदी घातली होती. ज्यामध्ये डॉन आणि जिओ न्यूज सारख्या प्रमुख माध्यमांचे तसेच इर्शाद भट्टी, अस्मा शिराजी आणि उमर चीमा सारख्या पत्रकारांचा समावेश होता. भारताविरुद्ध प्रक्षोभक, सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील सामग्री आणि खोट्या कथा पसरवल्याचा आरोप भारताने केला होता. माजी क्रिकेटपटू शोएब अख्तरचे युट्यूब चॅनेल देखील भारतातून काढून टाकण्यात आले होते, ज्याचे ३.५ दशलक्षाहून अधिक सबस्क्राइबर होते. एकत्रितपणे, बंदी घातलेल्या प्लॅटफॉर्मची एकूण फॉलोअर्स संख्या सुमारे ६.३ कोटी होती, असेही वृत्तातून समोर आले आहे.

------------

### जलसंपदा विभागाची महामंडळे स्वायत्त

बैठक पार पडली. या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. या बैठकीला जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणमंत गुणाले, मुख्य अभियंता (प्रकल्प) हणुमंत धुमाळ, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. पत्रकारांशी संवाद साधताना विखे पाटील म्हणाले की, जलसंपदा विभागाची सध्या कार्यरत असलेली महामंडळे सद्यस्थितीत शासनावर अवलंबून आहेत. या महामंडळांचा विकास करण्यासाठी निधी अपुरा पडत आहे. त्यासाठी महामंडळे स्वायत्त केल्यास या महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या साधनांचा वापर करून निधी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. त्याचबरोबर महांडळाच्या क्षेत्रात पर्यटन विकास वाढीवर भर देण्यात येऊन आणखी निधी कसा उभार करता येईला यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. फिशरी विकास करण्यासाठी कार्यपध्दतीचा वापर करण्यावर राहणार आहे. सध्या महामंडळाकडे मनुष्यबळाची कमतरता आहे. प्रभावी मनुष्यबळासाठी युटिलायझेशन करण्यात येणार आहे. सध्या महामंडळात कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी यांचे पगार राज्य शासन करीत आहे .मात्र महामंडळे स्वायत्त झाल्यानंतर अधिकारी, कर्मचारी यांचा पगार स्वत: महामंडळे करतील. सरकारी अनुदानावर महामंडळांना अवलंबून राहता येऊ यासाठी निधी कसा उभा करता येईल, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. याबरोबरच महामंडळासाठी वित्तीय सल्लागार नेमण्यात येणार आहे.

------------

### ओबीसी समाज जास्त

नाही. मराठा कुणबी पण लिहू शकतात. आपण छत्रिय मराठा आहोत. आपण युद्धकाळात लढाया केल्या आहेत. गेली शेकडो वर्षे शेती करतोय. शेती करणारे कुणबी. मराठे आणि कुणबी एका अर्थी एकच आहेत, ते वेगळे नाहीत. मात्र जनगणनेचा अर्ज आणि त्याचा उद्देश बघितल्यानंतरच मराठा समाजाला आवाहन करीन, असे जरांगे यांनी म्हटले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रातील मोदी सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

--------------

### दोन्ही राष्ट्रवादीचे लवकरच

पक्षात भाकरी फिरवण्याचा निर्णय हा जयंत पाटलांनी घ्यावा, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे आगामी काळात पुन्हा एकदा राजकीय भूंकप होणार का असा प्रश्न निर्माण झाला असून खासदार सुप्रिया सुळे या काय भूमिका घेतात हे पाहणे महत्वाचे असणार आहे. राष्ट्रवादी सोबत आपण जायला हवं, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील सोलापूर जिल्ह्यातील आमदार आग्रही आहेत. पंधरा दिवसांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील आमदार अभिजीत पाटील, नारायण पाटील, उत्तमराव जाणकर, राजू खरे यांनी शरद पवारांना भेटून आपण राष्ट्रवादीत गेल पाहिजे अशी विनंती केली होती. विरोधी पक्षात असताना मोठ्या प्रमाणात निधीच्या अडचणी येत असल्याची आमदारांची भावना आहे. सदर आमदारांकडून वारंवार अजित पवारांची भेट घेण्यात आल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. आगामी काळात अजित पवारांसोबत गेल्यास मतदारसंघ टिकवता येईल, लोकांची कामे करता येतील अशी आमदारांची भावना असल्याचं बोललं जातंय. जर आत्ताच आपण प्रवेश केला नाही तर आगामी काळात आपले मतदारसंघातील विरोधक सत्ताधारी पक्षासोबत जातील आणि पुन्हा निवडून येण अडचणीच होऊ शकेल अशी आमदारांची मानसिकता आहे.

## पान ६ वरून...

### मागण्या मान्य न केल्यास वंचित बहुजन

पत्रिका न जाहीर केल्याने आम्ही सर्व विद्यार्थी व आंबेडकर अनुयायी १४ मे नंतर अंबाजोगाई शहराच्या शैक्षणिक विकास व वारसासाठी कोणत्याही क्षणी लोकार्पण करत असल्याबाबत. शहरात दिवसेंदिवस सर्वच प्रभागात दूषित पाण्याचा पुरवठा केला जात असून रोगराई व आजाराचे प्रमाण शहरात पाण्यामुळे वाढत असून संबंधित कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करत पाणी पुरवठा सुरळीत करणेबाबत. तसेच गृहनिर्माण विभाग, शासन परिपत्रक, दिनांक २०/१०/२०१८ नुसार प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास घरकुल योजना (शहरी) करिता मागील तीन वर्षांच्या कराच्या पावतीच्या आधारे लाभार्थी पात्र करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला त्याची तात्काळ अंमलबजावणी करणेबाबत. नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांचे थकीत वेतन तात्काळ अदा करणेबाबत. नगर परिषद अंतर्गत सेवेत असणाऱ्या शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचे ''मार्च व एप्रिल'' महिन्याचे वेतन अदा करत संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन न थकीत करता वेळेवर वेतन अदा करण्यात यावे. दिव्यांग बांधवांचा ५ टक्के राखीव निधी तात्काळ दिव्यांगांच्या खात्यात वितरीत करण्यात यावा. रविवार पेठ पाण्याची टाकी जवळील साकुड रोड भागातील भीमाई नगर, परशुराम नगर व ईदगाह परिसर या भागातील नागरिकांना पंतप्रधान शहरी आवास योजना, शहरी रमाई आवास घरकुल योजना व शहर विकासा अंतर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ देण्यात यावा आणि हा भाग नगर परिषद हद्दीत समाविष्ट करण्यात यावा. या सर्व वरील मागण्या मान्य करण्याचे विनंती पत्र वंचितने सादर केले असून यावेळी वंचितचे शहराध्यक्ष गोविंद मस्के, महासचिव नितिन सरवदे, लखन होके, सुनिल कांबळे, समाधान कसबे, शिवा सोनवणे, दिपक पोटभरे आदी उपस्थित होते.

--------------

### अखंड नामजप सप्ताहाची सुरुवात राष्ट्रगीत व

वृद्धांपर्यंत प्रत्येकाने यात भाग घेतला. महिलांनी पारंपरिक पोशाखात सहभागी होऊन वातावरण अधिक मंगलमय केले. प्रारंभानंतर श्रीराम नामस्मरणाचा अखंड जप सुरू झाला असून, तो पुढील सात दिवस अखंड चालणार आहे. या उद्घाटन सोहळ्याला गावातील विविध मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, आणि युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम्?च्या घोषणांनी झाली. हा उपक्रम गावाच्या एकोप्याचे आणि देशभक्तीच्या भावनेचे प्रतिक ठरत असून इतर गावांनी देखील अशा उपक्रमातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन अनेकांनी केले आहे.

--------------

### सर्व विभागांनी ३१ मे पूर्वी पावसाळा

खात्री करून घ्यावी तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन याचे पूर्ण नियोजन करावे असे श्री जॉन्सन म्हणाले. पुराचा धोका असलेल्या गावांमध्ये पुरेसा अन्नसाठा असणे आवश्यक आहे तसेच पावसामुळे पसरू शकतील अशा आजारांवरील औषधे देखील ग्रामीण रुग्णालय स्तरावर असतील याची खात्री करावी. पावसाळ्यात साप चावण्याचे प्रकार घडू शकतात त्यामुळे ग्रामीण रुग्णालयात त्या संदर्भातील लस उपलब्ध करून ठेवा असे जिल्हाधिकारी म्हणाले. काही ठिकाणी अतिवृष्टी होऊन नुकसान होते अशा ठिकाणी आदेशाची वाट न बघता तालुक्यातील कृषी अधिकारी व तलाठी यांनी तात्काळ पंचनामे करावे असेही निर्देश जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी दिले. पावसात वीज पुरवठा सुरळीत राहील तसेच रस्त्यावरील वाहतूक उत्तम पद्धतीने सुरू राहील याची खबरदारी यांनी सांगितले.

--------------

### आदर्श मुख्याध्यापिका अनिता उत्तमराव जोगदंड

साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन मशमोहन जगताप यांनीही मॅडम ला पुढील आयुष्यासाठी शुभेच्या दिल्या.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष विजय साळवे यांनी आपल्या भाषणात जोगदंड ताई चे कौतुक करून समाजकार्य करण्याचा सल्ला दिला या कार्यक्रमात रिपाई आठवले गटाचे तालुका अध्यक्ष अविनाश जावळे ,कचरू तात्या खळगे, भीमराव नाडे, कंधारे मॅडम ,भारत टाकनखार,फपाळ,डॉ.सिद्धार्थ टाकनखार,प्रशांत शिंदे यांनी आपल्या भाषणात अनितातार्ड यांना शुभेच्छा दिल्या यावेळी जोगदंड यांच्या नाती अवनी व आरोही यांनी आपल्या मनोगतातून आजी विषयी आदर व्यक्त केला या कार्यक्रमा अगोदर आमदार प्रकाश सोळंके माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील राष्ट्रवादीचे नेते दयानंद स्वामी यांनी कार्यक्रम स्थळी येऊन अनितातार्ड यांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमास पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, महेंद्र मस्के,तानाजी सिरसट,भदर्गे, अमर साळवे,एकनाथ मस्के, सदाशिव,भालेराव, गटशिक्षणाधिकारी महामुनी यांच्यासह बहुसंख्य शिक्षक शिक्षिका राजकीय नेते उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रदीप जोगदंड यांनी केले , कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अशोक वाडेकर व काळे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिल अर्जुने सर यांनी केले.

--------------

### व्यापाऱ्यांनी साठेबाजी न करता शेतकऱ्यांना

करणाऱ्या बँकांची गळ केली जाणार नसून राज्य शासनामार्फत रिझर्व बँकेला उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या बँकांचा अहवाल पाठवण्यात येईल याची खबरदारी बँकांनी घ्यावी व शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे असेही यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. केंद्र व राज्य सरकार केळी मोसंबी संत्रा चिकू आधी फळ पिकावर अनुदान देते त्या अनुदानाचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून शेतकऱ्यांना फळ पिकाच्या अनुदानाचा फायदा द्यावा असेही यावेळी त्यांनी सांगितले. येणाऱ्या टप्प्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतील गावांना कृषी विभागामार्फत मोठा फायदा होणार असून या योजनेतील गावांमध्ये फळबाग सिंचन विहिरी शेत तलाव ठिबक तुषार यासह ट्रॅक्टर रोटावेटर व अन्य शेती उपयोगी साहित्य उपलब्ध करून दिले जाते त्यासाठी निवड झालेल्या गावातील सरपंच ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांनी या योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत कसा पोहोचेल यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी, शेतकऱ्यांपर्यंत प्रत्येक गोष्टीची तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी, मतदारसंघातील प्रत्येक सर्कल मध्ये, अध्यात्म वस्तीची जोड घालत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची माहिती देण्यात येणार असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले येणाऱ्या काळामध्ये प्रगतशील शेतकऱ्यांचा संपत्ती सत्कार करण्यासाठी आपण कटिबद्ध असून, शेतकऱ्यांच्या पोरांनी राजकारणाला चवीपुरते वापरत आधुनिक शेतीकडे आपले लक्ष केंद्रित ति करावे जेणेकरून ग्रामीण भागातील शेती क्षेत्राचा विकास शेतकऱ्याची आर्थिक उन्नती साधली जाईल अशा प्रकारची उत्कृष्ट शेती करावी असेही यावेळी बोलताना ते म्हणाले.यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार प्रतिभा गोरे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री रोडगे, गटविकास अधिकारी राजेश तांगडे, रमेश भापकर, संपत टकले अशोकराव बरकुले उपसभापती संभाजी वारे तुकाराम सोळंके परमेश्वर लाटे, मधुकर मोरे, अनिरुद्ध कातारे, ओमप्रकाश मोर, गोविंद मोर, बाबाराव थोरात, नसरुल्ला काकड, भगवान आरडे, गणेश सोळंके, नामदेव खोसे यांच्यासह मोठ्या संख्येने विविध विभागाचे अधिकारी तलाठी मंडळ अधिकारी ग्रामसेवक कृषी सहाय्यक सरपंच उपसरपंच यांची उपस्थिती होती.

--------------

### दुसऱ्या व चौथ्या तालुकास्तर

करणे गरजेचे आहे. तसेच सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार विभागस्तरावर व जिल्हास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड करून जलद गतीने प्रकरणाचा निपटारा करता सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळावेळी लोक अदालतीचे आयोजन करण्यात येते. त्याच धर्तीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते/पाणंद रस्ते मोकळे करुन लवकर न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा, यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तालुकास्तरावर सस्ती अदालत आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार, दि. ९ मे, २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत या कालावधीत सस्ती अदालतीचे कामकाज सुरु राहणार आहे. जिल्ह्यातील सर्व तालूक्यात सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी गरजु शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह तालुक्याचे तहसिलदार यांच्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा लाभ जास्तीत-जास्त सामान्य, गरजु शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी कळविले आहे

--------------

### पिंपरी (घाट) येथे भोजनातून विषबाधा

तक्रारी जाणवू लागल्या. यानंतर ग्रामस्थांना घेऊन सरपंच काशिनाथ कातकडे यांनी त्वरित स्वाराती रूग्णालयाकडे धाव घेतली. अपघात विभागातील सीएमओ मारूती आंबाड, सर्व परिचारिका, कर्मचारी यांच्यासह राहुल (बाबा) गित्ते यांनी तातडीने रूग्णांना दाखल करून घेत उपचार सुरू केले. सध्या सर्व रूग्णांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रूग्णालय प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, आमदार धनंजय मुंडे यांनी रूग्णालय प्रशासनाशी संपर्क साधून बाधितांच्या प्रकृतीविषयी विचारपूस केली आणि योग्य त्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

-----------

### इंडिया डिझाइन वीक साठी

प्रॉडक्ट डिझाइन, व्हिज्युअल डिझाइन आणि कला यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम ऑफर करते. यामध्ये डिप्लोमा, बॅचलर, मास्टर आणि शॉर्ट-टर्म कोर्सेस यांचा समावेश आहे. अभ्यासक्रम हे उद्योगाच्या गरजा आणि नवीनतम ट्रेंड यांना अनुसरून डिझाइन केलेले असतात. दरवर्षी आयोजित होणाऱ्या फॅशन शो आणि प्रदर्शनांमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे काम जागतिक व्यासपीठावर सादर करण्याची संधी मिळते. इन्स्टिट्यूटो मरांगोनीने जगभरातील अनेक यशस्वी डिझायनर्स आणि फॅशन व्यावसायिक तयार केले आहेत. भक्ती बबनराव लोणीकर यांनी या संस्थेत प्रथम क्रमांक मिळवून आणि 'इंडिया डिझाइन वीक २०२५' साठी निवड होऊन या संस्थेची प्रतिष्ठा आणखी उंचावली आहे. भक्ती लोणीकर ने महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केल्या ने अभिनंदना चा वर्षाव होत आहे.

-------------

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

३

शुक्रवार, दि. ९ मे २०२५

## आष्टीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारीपदी सिमा टकले



आष्टी : येथील प्रभारी गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव दि.३० एप्रिल २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या रिक्त जागी पदाच्या जागी सेवा जेष्ठतेनुसार जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सीमा सुरेश काळे (टकले) यांना प्रभारी गटशिक्षण अधिकारी म्हणून नियुक्ती दिली आहे. आष्टी येथील गटशिक्षणाधिकारी या पदावर सुधाकर यादव यांनी आष्टी येथील शिक्षण विभागाला चांगली सेवा देत शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केले. दि.३० एप्रिल रोजी सुधाकर यादव हे नियत वयमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांच्या जागी प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून प्रशासनाने सीमा सुरेश काळे ( टकले) यांना नियुक्ती देण्यात आले आहे.

# बॅनर फाडणाऱ्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी उपोषण

### बॅनर्स फाडतानाचे सीसीटीव्ही फूटेज झाले व्हायरल; लेखी आश्वासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात उपोषण मागे

केज/प्रतिनिधी

बॅनर फाडणाऱ्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी केज तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण, बॅनर्स फाडतानाचे सीसीटीव्ही फूटेज झाले व्हायरल झाले आहे. नायब तहसीलदार अशोक भंडारे,दलित चळवळीतील नेते आणि विविध संघटनेचे व पक्षाचे लोकप्रतिनिधी यांच्यासह पत्रकार बांधवांच्या मध्यस्थीने पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण करर्ते तात्या गवळी यांनी तात्पुरत्या स्वरूपात उपोषण मागे घेतले असून यावेळी माध्यमाची बोलताना तात्या गवळी म्हणाले की, पोलीस प्रशासनाने दिलेल्या आश्वासना मुळे मी आज रोजी माझे उपोषण तात्पुरत्या स्वरूपात मागे घेत आहे परंतु जर पोलीस प्रशासनाने माझ्या मागणीचे दखल घेतली नाही तर यापुढे तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन करणार असल्याचा प्रशासनास इशारा दिला आहे. राष्ट्रपुरुषांचे फोटो असलेले बॅनर काही समाजकंटकांनी फाडल्याने त्यांच्या राष्ट्रपुरुषांचा अवमान झाला असून नागरिकात तीव्र संताप उमटला आहे.

या बाबतची माहिती अशी की, दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री १:४५ ते२.०० वाजण्याच्या सुमारास एका चार चाकी गाडीचे नुकसान करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोसह सर्व राष्ट्रपुरुषांचे फोटो असलेले आणि शुभेच्छुक तात्या गवळी यांचा




फोटो असलेले बॅनर हे सुमित कैलास लांडगे यान फाडले. हा प्रकार एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. बॅनर फाडणारा सुमित लांडगे हा बॅनर फाडून नाचून व हसून त्या ठिकाणी बाजूलाच असलेल्या त्याच्या साथीदाराला दाखवल आहे. त्या ठिकाणाहून काही त्याचे साथीदार हे पळून जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहेत. सुमित लांडगे व त्याच्या इतर साथीदाराने जाणीवपूर्वक बॅनर फाडून राष्ट्रपुरुषांचा अवमान केला आहे.या पूर्वी मागील दोन ते तीन वर्षा पासून या समाजकंटकांनी या भागात दहशत पसरली असून ते कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचे काम करत आहेत. त्यांच्यामुळे या भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात सतत त्रास होत आहे. त्याच बरोबर या भागातील काही वाहनांच्या बॅटऱ्या व मोटरसायकलसह इतर वस्तू देखील चोरीला गेलेल्या आहेत. त्यामध्ये यांचा समावेश असण्याची शक्यता आहे. सदर घटना ही दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री घडली असुन दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी पोलीसांना सदर प्रकरणाची सर्व माहिती माहित असतांना देखील अद्याप ही आरोपी विरुद्ध कारवाई केलेली नाही. या समाजकंटकांनी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा असलेले बॅनर फाडून अवमान करुन समाज बांधवांच्या भावना दुखावल्या असतांना देखील पोलीसांनी सदर प्रकरणी गांर्भीय पुर्वक कार्यवाही करण्यात गरजेचे असतांना कार्यवाही केली नाही. यामुळे तात्या गवळी यांनी व्यथित होऊन दिनांक ७ मे २०२५ रोजी तहसील कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसले होते. दरम्यान या उपोषणाला दलित चळवळतील अनेक नेत्यांनी व राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह पत्रकार बांधवांनी भेटी देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे. नायब तहसीलदार अशोक भंडारी, संघटनेच्या व पक्षाचे पदाधिकारी आणि पत्रकार बांधवांच्या विनंतीला मान देऊन पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या लेखी आश्वासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात तात्या गोळी यांनी त्यांचे आमरण उपोषण मागे घेतले आहे. सदर प्रकरणी तपास वेगाने करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने कायदेशीर कारवाई करण्यात येईल व राष्ट्रपुरुषांचे बॅनर फाडणाऱ्या समाजकंटकासह त्याचे साथीदार व त्यांच्या मुख्य सूत्रधारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर उपोषण करर्ते तात्या गवळी यांच्या मागण्या प्रमाणे सदर प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत लवकरच लेखी दिलेल्या आश्वासनानुसार कारवाई केली जाणार आहे.

## योगेश्वरीच्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराचा समारोप



अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी व श्रीमती कमल खुरसाळे न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात आलेल्या महिला आत्मभान शिबीराच्या समारोप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सहसचिव प्रा. भीमाशंकर शेटे होते व्यासपीठावर सल्लागार एम.एस.लोमटे, संचालक आर.व्ही. सोनवळकर,एल. जी. वैद्य,ॲड. कल्याणी विर्धे, प्राचार्य एम.व्ही. कानेटकर आदीसह योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. भीमाशंकर शेटे म्हणाले की, जवळपास दोनशे वर्षापूर्वी महिलांची अवस्था वाईट होती त्यांच्यावर अत्याचार अन्याय व्हायचे नंतर पुढे महात्मा बसवेश्वर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासह इतर समाज सुधारकांनी स्त्रियांच्या अन्याया विरुद्ध लढा दिला त्यांना शिक्षणा साठी प्रवृत्त केले आणि माहिलांमध्ये गतिमानता आली. मुलींसाठी होत असलेले आत्मभान प्रशिक्षण शिबिर प्रेरणादायी असून मुलींमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी त्याचप्रमाणे त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद मिळावी ,स्वरक्षण करता यावे यासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने आत्मभान शिबिर होतात यात अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले शिबिरार्थी विद्यार्थिनी मयुरी, वैष्णवी, प्रशिक्षक अंकुश गायकवाड यांनी शिबिरा बाबत आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात चौसाळकर म्हणाले की, महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीर मुलींसाठी उपयुक्त असून यामुळे शारिरीक क्षमता वृद्धींगत होते इथे झालेल्या विविध कवायतीचा सराव वर्ष भर करावा. शिबिरातील मुलींनी योगासने, काठी - लाठी, तलवारबाजी, कराटे इत्यादी वेगवेगळे प्रात्यक्षिके करून दाखवले. प्रास्ताविक ॲड. कल्याणी विर्धे यांनी केले. प्रा.सचिन कळलावे यांनी संचालन प्रा. सारिका जगताप यांनी आभार मानले. संस्थेचे पदाधिकारी, विविध विभागाचे प्रमुख,शिक्षक, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी पालक, शिबीरार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

## सस्ती अदालतीचा लाभ घेण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगरला भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांशी तक्रारी या शेतरस्ते, पाणंदरस्ते वरील अतिक्रमणाबाबत असल्याचे निदर्शनास आल्याने या विषयाबाबत बीड जिल्ह्यातील सर्व सबंधित नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता वेबिनारचे आयोजन करण्यात येऊन संबंधित नागरिकांसोबत संवाद साधण्यात आला. त्यामधील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा सहभाग शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करून देण्याच्या अनुषंगाने मागणी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी मामलेदार मधील तरतुदी मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके तसेच मंत्री, (महसूल) महाराष्ट्र राज्य यांनी शेत रस्त्यावर अवलंबित असलेली प्रकरणी एका महिन्यात निकाली काढण्याबाबत निर्देशाच्या अनुषंगाने तालुक्यातील शेतरस्ते,पाणंद अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे असल्याने.सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय यांच्याकडील निर्देशानुसार जिल्ह्यातील तालुकास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड होऊन जलद गतीने प्रकरणाचा निपटारा व्हावा व सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळोवेळी लोक आदालतीचे आयोजन करण्यात येते.त्याच धरतीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पंधरा दिवसातून एकदा एका ठिकाणी तहसील कार्यालयात आणि मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी 'सस्ती अदालत'या नावाने बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात 'सस्ती अदालत' हा उपक्रम राबविण्यासाठी महिन्यातील दुसरा व चौथा शुक्रवार या दिवशी राबविण्यात येणार आहे सबब शेतरस्ते,पांदण रस्तयाबाबत तक्रारी असलेल्या शेतक-यांनी या सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.

## पाण्याच्या टंचाईत आमेर इनामदारचा मोलाचा पुढाकार

### दोन दिवसांपासून मोहमदिया कॉलनीत टँकरद्वारे निस्वार्थ सेवा

बीड । प्रतिनिधी

शहरात कडक उन्हाळ्यामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटचाईच्या पार्श्वभूमीवर बीड नगरपरिषदेकडून २५ दिवसांपासून नळांना पाणीपुरवठा न झाल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पिण्याचे आणि वापराचे पाणी मिळवण्यासाठी नागरिकांना दररोज भटकंती करावी लागत असून प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे जनतेत तीव्र असंतोष पसरलेला आहे.अशा परिस्थितीत प्रभाग क्रमांक २१ मधील मोहमदिया कॉलनीत आमेर इनामदार या सामान्य युवकाने एक प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्यांनी स्वखर्चाने टँकरच्या माध्यमातून विविध गल्ल्यांमध्ये फिरत नागरिकांना पाणीपुरवठा सुरू केला आहे. नगरसेवकही अपयशी ठरत असताना आमेर इनामदार आपल्या प्रयत्नांत सातत्य ठेवत आहेत.गेल्या दोन दिवसांपासून मोहमदिया कॉलनीतील प्रत्येक गल्लीबोळात टँकरमधून पाणी वाटप करत नागरिकांना दिलासा देणारे इनामदार हे नागरिकांच्या आशेचा किरण ठरले आहेत. त्याच्या या निस्वार्थ सेवेमुळे परिसरातील नागरिक समाधान व्यक्त करत असून त्यांच्यावर आशीर्वादांचा वर्षाव करत आहेत.शासन आणि प्रशासनाने यापासून प्रेरणा घेत तातडीने ठोस पावले उचलावी, अशी नागरिकांची मागणी आहे.



## अंबाजोगाईत १३ मे रोजी चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पढते पुढे कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा १३ मे रोजी वाढदिवस असून त्या निमित्ताने अंबाजोगाई शहरात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये 'चला हवा येऊ द्या' आणि 'मराठी पाऊल पढते पुढे' यांचा समावेश असून अंबाजोगाई शहर तथा पंचक्रोशीतील नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपाचे अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय गंभीरे व युवक कार्यकर्ते अमोल पवार यांनी केले आहे.

दरम्यान कार्यक्रमाच्या पुर्व तयारीसाठी 'अक्षय' निवासस्थानी कार्यकर्त्यांची बैठक होवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध समित्या तयार करून जबाबदारींचे वाटप करण्यात आले आहे. हा भव्य कार्यक्रम शहरातील मध्यभागी असलेल्या सेंट एँन्थोनी स्कुलच्या मैदानावर घेतला जात असून व्यवस्थेतील प्रमुख पदाधिकार्यांनी त्या दृष्टीने मैदानाची काल पहाणी करीत रचना केली आहे. युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस तसं पहाता



मोठ्या प्रमाणात साजरा करणे हे त्यांना स्वत:च मान्य नसते. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव व प्रेमापोटी यंदा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरविल्याचे संजय गंभीरे व अमोल पवार यांनी सांगितले. 'चला हवा येऊ द्या' हा कार्यक्रम विनोदी म्हणून ओळखला जातो. ज्यामध्ये निलेश साबळे, भाऊ कदम, सागर करांडे, कुशाल बद्रिके, भारत गणेशपुरे आणि श्रेया बुगडे आदींचा समावेश आहे. मागच्या दहा वर्षांपासुन हा कार्यक्रम खर्या अर्थाने महाराष्ट्राच्या घराघरात जावून पोहोचलेला असून तो पहाण्यासाठी लोकांची गर्दी देखील मोठ्या प्रमाणावर वाढते. 'झी मराठी'च्या वाहिनीवर मोठ्या प्रमाणावर रसिक कार्यक्रम पहातात. विनोदाची जुगलबंदी, मराठी गाण्यातून विनोदी विडंबन, वेगवेगळ्या वेशभुषेत कलाकारांची तुफान कॉमेडी याचे आकर्षण रसिकांना असते. 'थुकरटवाडी' हा त्यांचा विशेष कार्यक्रम गाजला असून महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात त्यांचे दौरे असतात. दरम्यान याच दिवशी 'मराठी पाऊल पढते पुढे' हा बहारदार गीतांचा कार्यक्रम देखील होणार असल्याचे ही संयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमाची शहरात जय्यत तयारी सुरू झाली. प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली 'अक्षय' निवासस्थानी बुधवार, दिनांक ७ मे रोजी घेण्यात आली. त्या बैठकीत कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा आणि त्यासाठी समित्यांची रचना करून प्रमुख पदाधिकार्यांना विविध जबाबदार्यांचे वाटप करण्यात आले. शहरात सेंट एँन्थोनी शाळेचे भव्य मैदान असून या ठिकाणी किमान सहा हजार रसिक-श्रोते यांना बसण्याची व्यवस्था तसेच अद्ययावत व्यासपीठ असणार आहे. सांस्कृतिक वारसा तथा साहित्य रसिकांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणार्या शहरात 'चला हवा येऊ द्या' आणि 'मराठी पाऊल पढते पुढे' हे दोन भव्य कार्यक्रम होणार असल्याने रसिकांच्या मनात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सध्या तरी कार्यक्रमाची शहरात जोरदार तयारी सुरू असल्याचे लक्षात येते. या मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या माध्यमातून विकासाची गंगोत्री शहरात आणि मतदारसंघात घेवून येण्यासाठी शासकिय पातळीवर पाठपुरावा करण्यात स्वत: अक्षय मुंदडांचा सिंहाचा वाटा असुन त्यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासात आमुलाग्र बदल झाल्याचे लक्षात येत आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शहराच्या कोनाकोपर्यातील रस्ते दर्जेदार सुमार झाल्याने सर्वत्र लोकांच्या मनातुन मुंदडा कुटुंबियांच्या बाबतीत कौतुकाचा वर्षाव होताना दिसतो. या कार्यक्रमाचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन भाजपचे अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय गंभीरे व अमोल पवार यांनी केले आहे.

## थोडक्यात



### बीड जिल्हा पोलीस पथसंस्थेच्या निवडणुकीत संचालक मंडळ बिनविरोध

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस पथसंस्थेच्या निवडणुका अत्यंत शांततेत व सर्वानुमते पार पडल्या असून, यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि संचालक मंडळाची बिनविरोध निवड करण्यात आली.या निवडणुकीत अध्यक्षपदी अशोक दुबाले, उपाध्यक्षपदी संघर्ष गोरे तर सचिवपदी ज्ञानेश्वर परळकर यांची निवड झाली आहे. तसेच संचालक मंडळात पुढील सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे .मनोज जोगदंड,मनोज वाघ,नितीन साळवे,सचिन जायभाय,संतोष म्हेत्रे,शहेंशा सय्यद,रेखा गोरे,रंजना सांगळे या सर्वसामान्य सदस्यांच्या एकमताने व सहकार्याने २०२५ ते २०३० या कार्यकाळासाठी ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली. या नव्या संचालक मंडळाच्या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, अनेकांनी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी यशाची शुभेच्छा दिल्या आहेत.या निवडीमुळे पथसंस्थेच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, गती व नवे उपक्रम राबवले जातील, असा विश्वास संस्थेच्या सदस्यांमध्ये व्यक्त होत आहे.

### नगरपरिषद प्रशासना विरोधात असलेल्या हंडा मोर्चात उपस्थित रहा -ॲड.राजपूत

बीड । प्रतिनिधी



शहराला कधी नव्हे ते अभुतपूर्व पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून मागील एक महिन्यापासून शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झालेला असून शहरातील नागरिकांना स्वतःच्या खिशाचे पैसे खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत आहे .त्यामुळे शहरातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सर्वसामान्य गोरगरीब नागरिक पाणी घेऊ शकत नाहीत ते दारोदारी पाण्यासाठी फिरत असल्याचे चित्र शहरात सध्या दिसत असून ,पाणी नसल्यामुळे शहरातील नागरिक महिला लेकीबाळी रात्री अपरात्री पाण्यासाठी वन-वन फिरताना दिसत आहेत. नगर परिषदेच्या ढिसाळ व नियोजन शून्य कारभारामुळे शहरातील नागरिकांना संकटाचा सामना करावा लागत आहे. यामुळे शहरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष व संताप निर्माण झालेला आहे .त्यामुळे दिनांक ९ मे २०२५ शुक्रवारी बीड नगर परिषदेच्या प्रशासना विरोधात निघणारे हंडा मोर्चात मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला प्रदेश सचिव व महाराष्ट्र करणी सेनेच्या महिला प्रदेशाध्यक्ष अँड.संध्याताई राजपूत यांनी केले आहे

### गेवराईत दहादिवसीय नृत्य, अभिनयाचे उन्हाळी शिबिर!

गेवराई । प्रतिनिधी

आर्ट ऑफ फन अकॅडमी,च्या वतीने दिनांक १० मे ते २० मे २०२५ दरम्यान गेवराई मधे सुप्रसिद्ध कलाकारांच्या उपस्थितीत दहा दिवसीय डान्स ॲक्टिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहिती अशी की, गेल्या चार वर्षापासून गेवराई शहरातील लहान मुलांना मूल्य शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविण्यासाठी कार्यरत असलेल्या आर्ट ऑफ फन अकॅडमीच्या वतीने ह्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांच्या कालगुनाणा वाव देण्यासाठी दिनांक १० मे ते २० मे दरम्यान दहा दिवसीय डान्स ॲक्टिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये, चित्रपट सृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेते , दिग्दर्शक श्री.गणेश देशमुख सर, झी युवा डान्स महाराष्ट्र डान्स फेम विजेती डान्सर वैभवी टाक , घर बंदूक बिर्याणी फेम सिने अभिनेते श्री.अशोक कानगुडे सर यांच्या सोबतच अनेक कलाकारांच्या उपस्थितीत पत्रकार भवन, डीवायएसपी ऑफिस शेजारी,शास्त्री चौक येथे हे दहा दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले आहे. तरी गेवराई तील सर्व रसिक प्रेक्षकांनी तथा सुजाण नागरिकांनी आपल्या मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी सदर शिबिरात सहभाग नोंदवावा नोंदवण्यासाठी दिपक गिरी - ८१७७९२४७५६, रोहित पुराणिक - ९३२५२१२१९९, शिवकुमार सोनवणे - ९६८९२६३२२०, विवेक शर्मा - ९८३४७६८६२० ह्या नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन आर्ट ऑफ फन अकॅडमी ने केले आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/२१६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २४/०४/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १ अशोक हरिश्चंद्र जाधव, २. कृष्णाबाई हरिश्चंद्र जाधव, सर्व्हे नं ४५४/१ प्लॉट नं. १३ सिटी सर्व्हे नं. २३२१ न.प.मि.न.१८-१३४-४१३/२ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पूर्वः ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं. १०
दक्षिण : प्लॉट नं. १२
उत्तर : याच प्लॉट नं. १३ मधील उर्वरित भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

cmyk

# पुणे जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाच्या तुरळक सरी

पुणे : पुणे जिल्ह्याच्या काही भागात पावसाने जोरदार हजेरी लावली. मात्र, काही ठिकाणी ऊन सावल्याचा खेळ सुरू होता. रात्री काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी पडल्या. झालेल्या पावसामुळे खरीप पूर्व शेतीकामांना सुरुवात झाली असून काही प्रमाणात शेतकऱ्यांनाही दिलासा मिळाला.

पुणे जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी मशागतीच्या कामांना सुरुवात झाली आहे. शिरूर, पुरंदर, इंदापूर, बारामती, खेड तालुक्यांतील काही भागात मशागतीना सुरुवात झाल्याचे चित्र आहे. मंगळवारी सायंकाळनंतर अचानक वातावरणात बदल झाला. तर सायंकाळनंतर वादळी वारे वेगाने वाहू लागल्याने झालेल्या पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाल्याने भात रोपवाटिकांच्या कामांना वेग येणार आहे. पुणे शहरातील अनेक उपनगरात सायंकाळपर्यंत ऊन्हाची झळ जाणवत होती. रात्री दहा वाजेच्या दरम्यान अचानक वातावरणात बदल होऊन उपनगरात काही ठिकाणी शिडकावा. त्यामुळे



हवेत काही प्रमाणात गारवा तयार झाला असून कमाल व किमान तापमानात घट झाली आहे. तर तळेगाव येथे १६.८ अंश सेल्सिअस एवढ्या किमान तापमानाची नोंद झाली. बुधवारी (ता. ७) सकाळी आठ वाजेपर्यंतच्या चोवीस तासांमध्ये आंबेगाव तालुक्यातील माळीण येथे १४.५ मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद झाली. तर निमगिरी येथे १२.५ मिलिमीटर, भोरमध्ये ९.५ मिलिमीटर, कुरवंदे ६.५ मिलिमीटर, लवासा ६.०, गिरीवन ०.५, बल्लाळवाडी ०.५, डुडूळगाव ०.५ मिलिमीटर पाऊस झाला असून पुणे शहरातील उपनगरातही पावसाचा तुरळक शिडकावा झाला. तर काही ठिकाणी जोरदार वादळी वारे वाहत असल्याने आंबा फळपिकांचे नुकसान झाले.

## भीमाशंकर साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांच्या खात्यात उर्वरित एफआरपी जमा!



आंबेगाव : आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये गाळप केलेल्या उसाची एफआरपी ३०७९.१२ रुपये येत आहे.

प्रथम अ‍ॅडव्हान्स २८०० रुपये प्रति टन वजा जाता उर्वरित २८० रुपये प्रति टनाप्रमाणे रक्कम ३१ कोटी ८७ लाख ७८ हजार रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर मंगळवारी (ता. ५ मे) वर्ग केली असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी दिली. बाळासाहेब बेंडे म्हणाले, की उच्च न्यायालय व शासनाच्या निर्णयानुसार मागील हंगामाचा साखर उतारा गृहीत धरून मागील हंगामाचा ऊस तोडणी वाहतूक खर्च वजा करावयाचा आहे. माजी सहकार मंत्री व कारखान्याचे संस्थापक संचालक आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ सभेतील निर्णयानुसार हंगामाकरिता देय एफ.आर.पी. ३०७९.१२ रुपये प्रति टन येत आहे. कारखान्याने हंगामात गाळप केलेल्या उसास प्रथम अ‍ॅडव्हान्स रु. २८०० रुपये प्रति टनाप्रमाणे रक्कम अदा केलेली आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये कारखान्याने एकूण ११ लाख ३८ हजार ४९६ टन ऊस गाळप केले आहे. उर्वरित एफआरपी २८० रुपये प्रति टनाप्रमाणे रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम ३१ कोटी ८७ लाख ७८ हजार रुपये सोमवारी (ता. ५ मे) वर्ग करण्यात आले आहे.


## पिकातील सुत्रकृमींचा प्रादुर्भाव आणि एकात्मिक नियंत्रण उपाय

वेगवेगळ्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळतो. या रोगाची सुरुवातीची लक्षणे दिसून येत नसल्यामुळे उपाय योजना करायला उशीर होतो व त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही पिकांच्या उत्पादनात सूत्रकृमींमुळे १२ ते १३ टक्के घट होते. जाणून घेऊ या सुत्रकृमी रोगाची सुरुवातीची लक्षणे व त्यावर करायचे एकात्मिक नियंत्रण उपाय.

प्रसाराची कारणे : प्रादुर्भावग्रस्त जमिनीत वापरली जाणारी शेती अवजारे, चप्पल व बूट यासोबत येणाऱ्या मातीमधून सूत्रकृमीचा प्रसार होऊ शकतो. प्रादुर्भावग्रस्त रोपे, बेणे यांचेमार्फत प्रादुर्भावग्रस्त जमिनीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे सूत्रकृमी शेतात येऊ शकतात. पक्षी किंवा कीटका मार्फतही या रोगाचा प्रसार होतो

सुत्रकृमीच्या गाठी कशा ओळखायच्या? : सुत्रकृमीमुळे झालेल्या गाठी ओळखणे अवघड असते. सूत्रकृमींच्या प्रादुर्भावामुळे पिकांच्या मुळावर वैशिष्ट्यपूर्ण गोलाकार सूज येऊन गाठी तयार होतात. डाळवर्गीय पिकांच्या मुळावरील गाठी आणि सूत्रकृमींच्या गाठी यामध्ये गोंधळ होऊ शकतो, मात्र त्यामधील फरक लक्षात घ्यावा. डाळवर्गीय पिके उदा. हरभरा, मूग, मटकी, उडीद, तूर किंवा तेलबिया पिके उदा. सोयाबीन, भुईमुग यांच्या मुळावर असलेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होतात. त्या पूर्णपणे गोलाकार आणि काही प्रमाणात लालसर असतात. या गाठी नत्र स्थिरीकरण करणाऱ्या उपयुक्त जिवाणूंमुळे तयार होतात. सूत्रकृमीच्या प्रादुर्भावामुळे तयार झालेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होत नाहीत. या गाठी म्हणजे मुळाचीच जादा झालेली बाह्य वाढ असते. या गाठींचा रंग मुळाप्रमाणेच असतो.

पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भावाची लक्षणे : पिकांच्या मुळ्या वेड्यावाकड्या होतात. पिकांना मुळाकडून पाणी व अन्नद्रव्यांच्या



पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मुळांची व पर्यायाने पिकांची वाढ खुंटते. पाने पिवळी पडलेली दिसतात. जमिनीमध्ये पाण्याचा अंश पुरेसा असतानाही पीक सुकल्यासारखे दिसते किंवा झाड संपूर्ण सुकते. भाजीपाला पिकात सुत्रकृमीच्या गाठींना तडे जाऊन त्या उघड्या पडतात. फुले, फळे कमी लागतात. जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत असे पीक मरून जाते. मोठ्या झाडामध्ये सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन झाडाझुडपांची वाढ मंदावते.

सूत्रकृमी नियंत्रणाचे एकात्मिक उपाय : उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोलवर नांगरट करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकामध्ये झेंडूची लागवड हा सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी उत्तम उपाय आहे. मिश्र पिकांची लागवड करावी. धैंचा, ताग यासोबतच मूग, उडीद, चवळी या सारखी द्विदल वर्गीय किंवा हिरवळीची पिके घ्यावीत. सेंद्रिय खते उदा. निंबोळी किंवा एरंड पेंड १.५ ते २ टन प्रति हेक्टर या प्रमाणात १५ दिवस अगोदर वापर करून पाणी द्यावे. सूत्रकृमींचा प्रादुर्भाव नसलेल्या किंवा प्रतिकारक रोपांचा वापर करावा. पॅसिलोमायसिस लिलियानस ही मित्र बुरशी सूत्रकृमींची नैसर्गिक शत्रू आहे. पॅसिलोमायसिस लिलियानस प्रमाणेच स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी यांची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात बीज प्रक्रिया करावी. जमिनीत शेणखतातून पॅसिलोमायसिस लिलियानस, स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या पैकी एक ५ ते १० किलो प्रमाणात १०० किलो संपूर्ण कुजलेल्या, ओलसर शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीत किंवा फळझाडांना खोडालगत मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. फ्लुयोपायरम (३४.४८ % एससी) २५० ते ३०० मि.लि. प्रति एकर या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे. किंवा ॲबामेक्टीन (१.८ ईसी) ४० मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणे मिसळून जमिनीमधून द्यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७६ : साली मेवाड शासक महाराणा प्रताप आणि मुघल शासक बादशाहा अकबर यांच्यात हल्दीघटीचे युद्ध झाले.
१६५३ : साली विश्वविख्यात जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नोंदल्या गेलेली ऐतिहासिक वास्तू ताजमहल ची निर्मिती जवळपास २२ वर्षानंतर पूर्ण झाली
१८७४ : मुंबईत प्रथम घोड्यांची ट्राम सुरु झाली.
१८७७ : पेरू देशाच्या किनारपट्टीवरील झालेल्या ८.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे २५४१ लोक ठार झाले.
१९०४ : वाफेवर चालणारे सिटी ट्रुरो हे इंजिन १६० किमी / ताशी पेक्षा जास्त वेगाने धावणारे यूरोपमधील पहिले इंजिन बनले.
१९३६ : इटलीने इथिओपिया देश बळकावला.
१९५५: पश्चिम जर्मनी देशाचा नाटो मधे प्रवेश.
१९७५ : विजेवर चालणारी टंकलेखन मशीन तयार करण्यात आली
१९९९ : अटलांटा ग्रांप्री नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रुपी उन्नीकृष्णनने प्रोन गटात रौप्यपदक पटकाविले.
१९९९ : ग्वाटेमालाच्या ज्युलिओ मार्टिनेझ याने ग्रॅन्ड प्रिक्स स्पर्धेतील वीस किलोमीटर चालण्याची शर्यत १ तास १७ मिनिटे व ४६ सेकंदात पूर्ण करुन नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी गुगलने इंटरनेट प्रोग्राम एड्सेंस सादर केला.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यासाठी आपला टोही नावाचा उपग्रह प्रक्षेपित केला.
२०१२ : अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी समलैंगिक विवाह करण्यास आपली अनुमती दिली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४० : मेवाडचा प्रसिध्द वीरपुरुष महाराणा प्रताप.
१८१४ : दादोबा पांडुरंग तर्खडकर, इंग्लिश व्याकरणकार, ग्रंथकार
१८३६ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचा जन्मदिन.
१८६६ : गोपाळ कृष्ण गोखले, भारतीय स्वातंत्र्यसेनानी, मराठी समाजसुधारक.
१८८६ : स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक केशवराव मारुतराव जेधे यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९५९ पुणे)
१८९६ : थोर स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेता व शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक केशवराव मारुतराव जेथे यांचा जन्मदिन.
१९२८ : वसंत नीलकंठ गुप्ते, मराठी कामगार चळवळ कार्यकर्ते, लेखक.
१९३५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी कवयित्री स्नेहमयी चौधरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३३८ : भगवद्भक्त चोखा मेळा हा मंगळवेढे येथील गावकुस बांधत असताना कोसळणार्या कुसबाखाली सापडला.
१९१७ : डॉक्टर, कवी व शास्त्रज्ञ कान्होबा रणझोडदास यांचे निधन.
१९१९ : रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १८६१)
१९३१ : वर्णपटाद्वारे प्रकाशाच्या मापनासंबंधीच्या शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे जर्मन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक अल्बर्ट मायकेलसन यांचे निधन. (जन्म: १९ डिसेंबर १८५२)
१९५९ : थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १८८७)
१९५९ : साली दक्षिण आफ्रिकेतील हिंदी विषयाचे प्राध्यापक व महात्मा गांधी यांचे निकटवर्तीय तसचं, राष्ट्रवादी, हिंदी आणि आर्य सामाजीक भारतीय स्वामी भवानी द्याल संन्यासी यांचे निधन.
१९८६ : एवरेस्ट शिखर सर करणारा शेरपा तेलसिंग नोर्गे यांचे निधन. (जन्म: २९ मे १९१४)
१९९५ : दिग्दर्शक अनंत माने यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १९१५)
१९९८ : पार्श्वगायक व अभिनेता, गझलचे बादशहा तलत महमूद यांचे निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १९२४ लखनौ, उत्तर प्रदेश)
१९९९ : उद्योगपती करमसीभाई जेठाभाई सोमय्या यांचे निधन.
२००४ : चेचेन्या येथे झालेल्या विस्फोटात तेथील राष्ट्रपती अखमद कादरोव यांचे निधन.
२००८ : किराणा घराण्याचे शास्त्रीय गायक पं. फिरोझ दस्तूर यांचे निधन.
२०१४ : भारतीय राजकारणी नेदुरुमल्ली जनार्दन रेड्डी यांचे निधन. (जन्म: २० फेब्रुवारी १९३५)

## कारल्याची लागवड : जाणून घ्या पेरणी ते काढणी

भारतीय शेतकरी पारंपारिक पिकांपासून दूर जाऊन भाजीपाला लागवड करून चांगला नफा कमावत आहेत. कमी वेळात जास्त उत्पन्न मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना भाजीपाला पिकवणे आवडते आणि त्यात ते यशस्वीही होतात. यापैकी एक कारला आहे, ज्याची मागणी बाजारात नेहमीच दिसून येते. यामध्ये व्हिटॅमिन ए, बी आणि सी चांगल्या प्रमाणात आढळतात. आयर्न, मँगनीज, कॅरोटीन, पोटॅशियम, मॅग्नेशियम, बीटाकॅरोटीन, ल्युटीन, झिंक इत्यादी अनेक पोषक तत्वे कारल्यामध्ये आढळतात, जे अनेक आजारांपासून दूर ठेवण्यास मदत करतात. कारल्याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते, कारण त्यात औषधी गुणधर्म असतात. त्याची बाजारपेठेत किंमतही चांगली आहे, कारल्याची लागवड करून शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात.

लागवडीसाठी योग्य माती कोणती? : कारल्याच्या लागवडीसाठी वालुकामय चिकणमाती सर्वात योग्य मानली जाते. याशिवाय नदीच्या काठावर आढळणारी गाळाची मातीही कारल्याच्या लागवडीसाठी चांगली मानली जाते.

कारल्याच्या लागवडीसाठी योग्य तापमान : कारल्याच्या लागवडीला जास्त तापमान लागत नाही. पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी २० अंश ते ४० अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. याशिवाय कारल्याच्या शेतात ओलावा राखणे देखील खूप महत्वाचे आहे.

कारल्याच्या सुधारित जाती : भारतामध्ये कारल्याच्या अनेक सुधारित जाती उपलब्ध आहेत, शेतकरी त्यांच्या क्षेत्रानुसार या जातींची निवड करतात. जर आपण कारल्याच्या त्या सुधारित जातींबद्दल बोललो जे अधिक लोकप्रिय आहेत, तर त्यात समाविष्ट आहेत - पुसा स्पेशल, हिसार सिलेक्शन, कल्याणपूर बारमाही,



कोईम्बतूर लवंग, पुसा टू सीझनल, पंजाब बिटर गॉर्ड -१, पंजाब -१४, सोलन ग्रीन, अर्का हरित, पुसा हायब्रीड-२, पुसा औषधी, सोलन सफेद, प्रिया को-१, -१, कल्याणपूर सोना आणि पुसा शंकर-१ इत्यादी सुधारित वाणांचा समावेश आहे.

लागवडीसाठी योग्य वेळ : शेतकरी वर्षातील १२ महिने कारल्याची लागवड करू शकतात, कारण शास्त्रज्ञांनी अशा संकरित जाती विकसित केल्या आहेत ज्याची लागवड शेतकरी वर्षभर करू शकतात. उन्हाळ्यात जानेवारी ते मार्च या कालावधीत, मैदानी भागात, पावसाळ्यात जून ते जुलैपर्यंत, तर डोंगराळ भागात कारल्याची पेरणी मार्च ते जूनपर्यंत करता येते.

कारल्याच्या शेतात सिंचन : कारल्याच्या झाडाला थोडेसे पाणी द्यावे लागते, त्याच्या शेतात ओलावा टिकवून ठेवणे फार महत्वाचे आहे. ही ओलावा टिकवून ठेवण्यासाठी शेतकरी हलके सिंचन करू शकतात. याशिवाय पिकामध्ये फुले व फळे येण्यास सुरुवात झाल्यावर हलके पाणी द्यावे. मात्र सिंचन करताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी लागते. कडबा शेतात पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा पीक खराब होऊ शकते.

तण काढणे : शेतकऱ्यांनी पिकाच्या सुरवातीला कारल्याची खुरपणी करावी. या रोपासोबत अनेक अनावश्यक इतर झाडे वाढतात, त्यामुळे अशा परिस्थितीत तुम्ही शेतात तण काढावे आणि इतर झाडे काढून टाकावीत. झाडाला सुरुवातीपासूनच तणमुक्त ठेवल्यास कडब्याचे चांगले पीक येते.

कारल्याची काढणी : कारल्याचे पीक पेरणीनंतर सुमारे ६० ते ७० दिवसांत तयार होते. शेतकऱ्यांनी त्याची फळे लहान व मऊ असतानाच काढावीत. काढणी करताना लक्षात ठेवा की कारल्याच्या देठाची लांबी २ सेमी पर्यंत असावी, असे केल्याने फळ जास्त काळ ताजे राहते. तुम्ही नेहमी सकाळीच कापणी करावी.

लागवडीत खर्च व नफा : एकरी कारल्याची लागवड करण्यासाठी शेतकऱ्याला सुमारे ३० हजार रुपये खर्च येतो. एक एकर जमिनीवर कडबा पिकाची लागवड केल्यास सुमारे ५० ते ६० क्विंटल उत्पादन मिळू शकते. एक एकर शेती करून शेतकरी सुमारे २ ते ३ लाख रुपयांचा नफा कमावू शकतात.

# लिंबागणेश येथे बांधकाम कामगारांचे ठिय्या आंदोलन

## सिईओ जिल्हा परिषद यांनी लेखी आदेश पारीत करण्याची मागणी





लिंबागणेश । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी देऊ नये याबाबत बीड जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीने प्रत्येक ग्रामसेवकांना लेखी आदेश काढले असून, यामुळे बांधकाम कामगारांचे नुकसान होत असून नूतनीकरण रखडलेले आहे.

बीड पंचायत समितीच्या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण गेल्या ९ महिन्यांपासून रखडले असुन बांधकाम कामगार (नुतनीकरण) पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असुन प्रत्येक वर्षी नोंदणी करणे गरजेचे आहे. मात्र यासाठी ९० दिवस काम केलेल्या प्रमाणपत्रावर ग्रामीण भागात ग्रामविकास अधिकारी यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत.

तसेच दि. ४ सप्टेंबर २०२४ रोजी मा. संगितादेवी पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना काढलेले आदेशाचे पत्र. जा. क्र. सा.प्र.वि. – ७/पं अ का वि/ ३६३२/२०२४ असूनही गटविकास अधिकारी सही देत नसल्याने त्यामुळे शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळ या योजनेंतर्गत विविध कल्याणकारी योजना जसे की कामगारांच्या मुलांना व कुटुंबियांना मिळणा-या मुला मुलींच्या शिक्षणासाठी मदत, सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत, आरोग्य सुविधा यापासून वंचित असुन शासन स्तरावरून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आधिका-यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दुर करण्यात यावी.

या मागणीसाठी आज दि.८ मे गुरुवार रोजी हरिओम क्षीरसागर जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.

यावेळी सिईओ जिल्हा परिषद बीड यांनी ग्रामसेवकांना लेखी आदेश पारित करावे अशी मागणी करण्यात आली. यावेळी आंदोलन स्थळी पंचायत समिती मार्फत ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर तसेच पोलीस प्रशासनामार्फत पोलीस अधिकारी बाबासाहेब डोंगरे, संतोष राऊत यांना लेखी निवेदन देऊन ठिय्या आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात आले. यावेळी या आंदोलनात डॉ. गणेश ढवळे, सेवा सहकारी सोसायटी चेअरमन रवींद्र निर्मळ, सुरेश निर्मळ, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, केशव गिरे,बांधकाम कामगार सय्यद रफिक, सय्यद सलिम, सय्यद फिरोज, सय्यद अयुब, दादा थोरात, सुधीर क्षीरसागर, बाळकृष्ण अंकुशे ,श्रीराम तागड, बापूराव आमदार, रामदास निर्मळ ,सुधाकर बागल, हनुमान अंकुशे ,बंकट लगास ,अभिमान अबदार तसेच असंघटित मजदूर पंचायतचे जिल्हा कोषाध्यक्ष रामभाऊ बादाडे तसेच बबनराव घुमरे इत्यादी उपस्थित होते.

कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी स्कॉलरशिप मिळत असून, गेल्या दहा ते अकरा महिन्यांपासून नूतनीकरण रखडल्यामुळे त्यांच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान देखील होत असून, भविष्यात कामाच्या ठिकाणी दुर्दैवी घटना घडल्यास त्यांना मिळणारा आर्थिक लाभ देखील यामुळे मिळू शकणार नाही. यामुळे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लवकरात लवकर सर्व ग्रामसेवकांना लेखी आदेश पारित करावेत अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा या ठिकाणी देत आहे.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लवकरात लवकर सर्व ग्रामसेवकांना ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रकावर स्वाक्षरी देण्यासाठी लेखी आदेश पारित करावे.

रामभाऊ बादाडे ( कोषाध्यक्ष असंघटित मजदूर पंचायत बीड जिल्हा )

तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी आदेश काढून देखील त्याची अंमलबजावणी नाही, ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात यावी.

– हरिओम क्षीरसागर ( जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ बीड )

# वै.जोग महाराज आणि सद्गुरु बंकटस्वामी महाराज गुरु शिष्याची आदर्श जोडी -वसंतगडकर



बीड । प्रतिनिधी

वारकरी सांप्रदायातील वै.सद्गुरू जोग महाराज आणि सद्गुरू बंकटस्वामी महाराज गुरु शिष्याची आदर्श जोडी आहे.संत बंकटस्वामी महाराज यांनी किर्तन मर्यादा आणि शुद्ध कीर्तन परंपरा सांगितली.असे प्रतिपादन श्री ह भ प बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांनी केले..संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, अयोध्येतील राम मंदिराचे पुजारी पंडित गजानन ज्योतकर गुरुजी.. श्री ह भ प केशव महाराज गित्ते.श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.

वारकरी संप्रदायातील महानसंत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कान्होबा तुझी घोंगडी चांगली । आम्हांसी कां दिली वांगली रे ।।धृ।। स्वगत सच्चिदानंद मिळोनी शुद्ध सत्त्व गुण विणली रे । षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुन्दरा शोभली रे ।।१।। काम कर्म अविद्या त्रिगुण पंचभुतांनी विणली रे । रक्त रेतु दुर्गंधी जंतु नरक मुतानें भरली रे ।।२।। षड्विकार षड्वैरी मिळोनी तापत्रयानें विणली रे ।नवा ठायीं फ़ाटूनि गेली ती त्वां आम्हांसि दिधली रे ।।३।। ऋषी मुनी ध्यातां मुखीं नाम गातां संदेहवृत्ती विणली रे । बापरखुमादेविवरु विठ्ठलें त्वत्पदीं वृत्ति मुरली रे ।।४।। या अभंगावर सुंदर चिंतन मांडले. यावेळी बोलताना बाळकृष्ण महाराज म्हणाले की वाणी पासून सर्व संत बंकटस्वामीची जन्म भूमी परम पवित्र आहे.संत बंकटस्वामी महाराज यांच्या दरबारात थापा मारून चालत नाही.. कधी कधी महालात जे सुख मिळत नाही ते सुख झोपडपीत मिळते.ज्या अवस्थेत आनंद ओसंडून वाहतो त्याला समाधान म्हणतात.बद्ध,जिज्ञासु ,मुमुक्ष्यु तीन अवस्था आहेत..मुमुक्ष्युअवस्था प्राप्त झाल्या शिवाय देव प्राप्त होत नाही.बंकटस्वामी महाराज मुमूक्षु अवस्थेला प्राप्त झालेले होते.भक्तीचा जन्म हृदय आणि ज्ञान हे बुद्धी मधून जन्मते. देवाचे स्वरूप आणि जीवाचे स्वरूप याचे घोगडीचे रूपक या अभंगात सांगितले..देवाला घोंगडी आवडते. देवाची घोंगडी शुद्ध सत्व गुणाची आहे. तुमची आमची नासकी आहे. ऋषी मुनी ध्यातां मुखीं नाम गातां संदेहवृत्ती विणली रे.. संतांची वृत्ती देव स्वरूप असल्याने ती घोंगडी शुद्ध होते..संत बंकटस्वामी महाराज यांनी किर्तन मर्यादा आणि शुद्ध कीर्तन परंपरा सांगितली. अस महाराज म्हणाले..यावेळी साथ संगत महाराष्ट्रातील नामांकित नारायण गडाचे लाडके गायक व युवा कीर्तनकार श्रीहरी महाराज गवते. बाबासाहेब महाराज शिंदे.मृदंग अलंकार पंडित अरुण महाराज कदम गुरुजी,मृदंग अलंकार बाजीराव महाराज काळे गुरुजी. याच्यासह बंकटस्वामी महाराज फडावरील शेकडो गुणिजन गायक वादक उपस्थित होते.

# सद्गुरू बंकटस्वामी कृपाळू आणि साक्षातकारी संत-प्रकाशानंदगिरी महाराज



बीड । प्रतिनिधी

सद्गुरू बंकटस्वामी कृपाळू आणि साक्षातकारी संत आहेत असे प्रतिपादन भागवताचार्य स्वामी प्रकाशांनदगिरीजी महाराज देवगडकर यांनी केले.संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ पुण्यतिथी उत्सवात भागवत कथेच्या पहिल्या दिवशी बोलत होते यावेळी प्रमुख उपस्थिती ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प.किसन महाराज पवार, श्री ह भ प दिनकर महाराज मते,श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प दिनेशानंद महाराज काळे श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ वा पुण्यतिथी उत्सवात श्रीमद् ? भागवत कथाव्यास स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथा सुरू आहे. तिसऱ्या दिवशी कथा सांगताना, वराह भगवान अवतार कथा ,दक्षप्रजापती यज्ञ कथा प्रसंग,भगवान वीरभद्र अवतार कथा, ध्रुवबाळ कथा, भगवान वृषभदेव कथा, भरत राजा कथा सांगितली. त्यानंतर ध्रुव बाळाची कथा,ध्रुव संताकडे कडे गेल्यावर प्रश्न विचारले आपला उद्धार कशाने होईल, देव कशांने भेटेल संताकडे गेल्यावर उद्धारासाठी मागणी केली पाहिजे. पाच वर्षाच्या ध्रुवाणे मधुवनामध्ये घोर तपश्चर्या केली. त्यानंतर देव प्रसन्न झाले.ज्याचा सखा हरी त्यावर विश्व कृपा करी. ध्रुवा कडे मृत्यू आला तर डोक्यावर पाय ठेवून विमानात बसून चालले. ज्या कुळात हरी भक्त जन्मला येतात त्या ४२ कुळाचा उद्धार करतात. त्यामुळे एकदा तरी हरी भक्त कुळात जन्मला यायला हवा.. अस महाराज म्हणाले.यावेळी कथेमधील भजनामध्ये मंडपातील श्रोते मंत्रमुग्ध झाले. या कथेत हजारो भाविक भक्त उपस्थित होते..

# लिंबागणेश येथे ऑपरेशन सिंदूर विजयाचा जल्लोष

लिंबागणेश । प्रतिनिधी

२२ एप्रिल जम्मू कश्मीर येथील पहलगाम या ठिकाणी पाक धार देण्यात दहशतवाद्यांनी २६ निष्पाप भारतीय पर्यटकांचे निर्गुण पणे हत्या केली होती. पहलगाम हल्ल्यातील पीडितांना न्याय देण्यासाठी'' ऑपरेशन सिंदूर ''अंतर्गत भारतीय सैन्य दलांनी लढाऊ विमाने आणि ड्रोनद्वारे क्षेपणास्त्राचे हल्ले करण्यात आले.या कारवाईत जैश -ए- मोहम्मद, लष्कर -ए-तोयबा, हिजबुल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांची युवकांची भरती,त्यांचे प्रशिक्षण, दहशतवाद्यांना भारतामध्ये घुसवण्यासाठी '' लॉन्चिंग पॅड''म्हणून वापरात येत असलेल्या काश्मीरमधील ५ आणि पाकिस्तान मधील ४ अशा एकुण ९ तळ जे गेल्या ३ दशकांपासून भारत विरोधी दहशतवादी कारवायांचे केंद्र राहिलेले आहेत. याठिकाणी हल्ले करून दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करून पहलगाम येथील हल्ल्याचा बदला घेतला आहे.




दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करणा-या ''ऑपरेशन सिंदूर'' अंतर्गत कारवाई केलेल्या भारतीय सेना आणि भारतीय सरकारचा आम्हाला सार्थ अभिमान असुन आम्ही एकजुटीने पाठिशी असुन भारतीय परंपरेत ''कुंकु''हे सौभाग्याचं लेणं मानलं जाते.पहलगाम हल्ल्यात काही नवविवाहित युवकांनी जीव गमावला.त्यांच्या विधवा पत्नींचे शोकाकुल चेहरे पाहून संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे ''ऑपरेशन सिंदूर'' मोहिमेची माहिती जगाला देणा-या दोन रणरागिनी भारत सरकारने पत्रकार परिषदेत माहिती दिली.यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्यासह लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि वायुदलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग याची माहिती देण्यासाठी निवड करत भारताच्या लेकी अतिरेक्यांना ठोस प्रतिउत्तर देऊ शकतात हा संदेश देण्यात आला. आज दि.८ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील मुख्य प्रवेशद्वारावर भारतीय सैन्य आणि भारत सरकारचे अभिनंदन करत '' भारत माता की जय,जय हिंद, भारतीय सेना जिंदाबाद,वंदे मातरम आदी घोषणाबाजी करत आतषबाजी करत विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव,भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे,माजी सरपंच कल्याण वाणी, विक्रांत वाणी,भगवान मोरे, दामोदर थोरात, विक्रम दाभाडे ,गणपत तागड,संतोष भोसले, सुदाम मुळे,अँड.गणेश वाणी, संजय घोलप,पांडुरंग वाणी, दादा गायकवाड,राजेभाऊ ढास, संजय सुकाळे, नितीन जाधव, शिवाजी शिंदे, शिवाजी रणखांब, बाजीराव दशमे, हरिओम क्षीरसागर आणि राम फाळके उपस्थित होते.

# कर्म हेच आपल्या सुख आणि दु:खाचे कारण आहे - माने महाराज

## श्रीक्षेत्र वांगी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

दिंद्रुड । प्रतिनिधी

कर्म हेच आपल्या जीवनातील दु:ख आणि सुख यांचे कारण आहे. कारण आपण जे काही करतो, त्याचा परिणाम आपल्या जीवनात दिसतो. चांगले कर्म हेच आपल्याला आत्म-विकास साधण्यास मदत करत असल्याचे प्रतिपादन हभप गुरुवर्य एकनाथ महाराज माने यांनी केले. कर्मच आपल्याला नैतिकतेचे पालन करण्यास आणि चांगले आचरण करण्यास प्रवृत्त करते असेही महाराज आपल्या काल्याच्या कीर्तनात म्हणाले. माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र वांगी येथे संत नारायण बाबा यांच्या ६८ व्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थानचे अध्यक्ष हभप गुरुवर्य एकनाथ महाराज माने यांची काल्याची कीर्तन सेवा संपन्न झाली.





बहु बरा बहु बरा या सांगाते मिळे चारा म्हणवुनी जिवेसाठी घेतली कान्होबाची पाठी या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर माने महाराजांनी निरूपण केले. माणसाच्या जीवनात असलेले कर्माचे महत्त्व सांगताना महाराज पुढे म्हणाले की, कर्म म्हणजे फक्त शारीरिक क्रिया नसून, विचारांचे आणि भावनांचेही परिणाम आहेत. कर्मानुसार, व्यक्तीचे जीवन आणि भविष्य बदलू शकते. सत्कर्म केल्याने आपल्याला आपले कर्तव्य आणि जबाबदारी याचे भान येते. त्यामुळेच आपल्या जीवनात योग्य दिशा मिळते व आयुष्याला अर्थ प्राप्त होतो असेही महाराज म्हणाले. सप्ताहभरात काकडा, विष्णुसहस्त्रनाम, संत तुकाराम महाराज गाथा पारायण, हरिपाठ, संगीत भजन, भारुड आदी दैनिक कार्यक्रम पार पडले. हभप कान्होबा महाराज मोरे ( देहूकर), हभप उल्हास महाराज सूर्यवंशी आळंदी (देवाची), हभप देविदास महाराज म्हस्के नेवासा, हभप उमेश महाराज दशरथे, हभप विष्णु महाराज जगताप पैठण, हभप ज्ञानेश्वर महाराज पाटील (जळकेकर), हभप संदिपान महाराज शिंदे हासेगावकर आदी नामवंत व गुणिजन महाराजांची कीर्तनसेवा झाली. सबंध महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या श्रीक्षेत्र वांगी संस्थान येथे हभप. राधाकृष्ण गरड गुरुजी (संगीत विशारद),

हभप उद्धव महाराज गरड, हभप रामेश्वर महाराज गरड (गुरुजी), हभप उत्तरेश्वर महाराज जाधव, हभप अविनाश महाराज गरड, हभप बालाजी महाराज मोहिते, हभप. राम महाराज गरड या नामवंत गायक मंडळींसह मृदंगमहर्षी अभिमन्यू आबा मुळे, हभप माणिक महाराज गरड, हभप भागवत महाराज चव्हाण, हभप गणेश महाराज माने या मृदंगाचार्यांनी आपली उपस्थिती लावून कीर्तनात संगीतसाथ केली. गणेश गटकळ व गणेश रासवे यांनी उत्कृष्ट निवेदन केले.

सप्ताहभरात हजारो भाविक भक्तांनी या भक्तीमय कार्यक्रमाचा लाभ घेतला. सादोळा येथील विलासराव सोळंके यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# प्रियंका काकडे हिचे बारावी परीक्षेत यश

पाटोदा । प्रतिनिधी

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, शेतात आई-वडिलांना मदत करत आणि अभ्यासात सातत्य राखत जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी कारेगाव येथील कु. प्रियंका प्रकाश काकडे हिने बारावीच्या परीक्षेत ८८.३३ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिचे हे यश खरोखरच प्रेरणादायी आहे.प्रियंका ही शेतकरी कुटुंबातील असून, वडील शेतात कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. शाळा आणि अभ्यासाच्या वेळेशिवाय प्रियंका नियमितपणे शेतकामात हातभार लावत होती. मात्र, या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडून तिने अभ्यासातही उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



शाळेचे मुख्याध्यापक म्हणाले, ''प्रियंका हिचे यश मेहनतीचा आणि चिकाटीचा उत्तम नमुना आहे. ती खरोखरच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरली आहे.'' प्रियंका भविष्यात सामाजिक शास्त्राच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेऊन समाजसेवेची दिशा घेण्याचे स्वप्न पाहते. तिच्या या यशामुळे गावकरी, शाळेतील शिक्षक, पालकांत आनंदाचे वातावरण असून,सर्वत्र तिच्या कौतुकाचा वर्षाव होत असुन बीड जिल्हा अनुलोमच्या वतीने तिचे विशेष अभिनंदन करण्यात आले

# मागण्या मान्य न केल्यास वंचित बहुजन आघाडीचे १४ मे पासून अंबाजोगाई नगर परिषद कार्यालयात बेमुदत धरणे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**दि.८ मे २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडीने शहरातील नागरिकांच्या विविध समस्या घेऊन नगर परिषद कार्यालयास बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला. या निवेदनात वंचित बहुजन आघाडीने अंबाजोगाई शहरातील विविध समस्या बाबत नगर परिषद अंबाजोगाई प्रशासनास आम्ही वेळोवेळी निवेदन व पाठपुरावा करत संबंधित खालील विभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी यांना सूचित करत त्या समस्या सोडविण्यासाठी निवेदने सादर केली , परंतु संबंधित विभाग व अधिकारी**



**यांच्याकडून दखल न घेता टाळाटाळ केल्या कारणाने आम्ही आंदोलन करण्याचा निर्णय घेत असल्याचे सांगितले . जोपर्यंत सर्व मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही याची नोंद घेत प्रशासनास पी टी आर नोंदणी, डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका केंद्र सुरू करणे, कंत्राटी सफाई कामगारांचे थकीत वेतन अदा करणे, शासकीय कर्मचारी यांचे वेतन अदा करणे, दिव्यांगांचा ५ टक्के राखीव निधी लाभार्थ्यांना अदा करणे, भीमाई नगर व साकुड रोड परिसरात शहरी योजनांचा लाभ देत हा भाग शहरी हद्दीत घेणे अशा विविध पुढील प्रमाणे मागण्या घेऊन निवेदन सादर केले.**

प्रभाग क्रमांक ४ (परळीवेस भाग) सह शहरातील सर्व प्रभागा मध्ये मालमत्ता / मागणी कर नोंदवहीत नोंद नसणारे मालमत्ता करापासून वंचित असणाऱ्या मालमत्तांचे पुनः सर्वेक्षण करत तात्काळ पथक प्रमुख व सहायक यांची नेमणूक करून १५ दिवसांच्या आत सर्वांचे सर्वेक्षण करत पी. टी .आर. नोंदणी करण्यात यावी. सदरील प्रक्रियेत टाळाटाळ करत असल्यास करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. रमाई आवास घरकुल योजना दुसऱ्या टप्प्यात १२३ मंजूर लाभार्थ्यांच्या खात्यासाठी दिनांक २८/०४/२०२५ रोजी अंबाजोगाई नगर परिषद खात्यात वर्ग केला असून , संबंधित मंजूर लाभार्थ्यांना ''मंजुरी पत्र'' देत लाभार्थ्यांच्या खात्यात निधी वितरीत करण्याची प्रक्रिया आठ दिवसांच्या आत पूर्ण करावी. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपूर्वी आपण सांगितल्या प्रमाणे १४ एप्रिल पूर्वी डॉ बाबासाहेब आंबेडकर मोफत अभ्यासिकेच लोकार्पण न करता आंबेडकर अनुयायी व गोर गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण न करता वेळ काढू भूमिका समोर ठेवत उद्घाटन करण्याचे ठरवले त्यात अद्याप पर्यंत या अभ्यासिकेच्या उद्घाटनाची कोणतीही कार्यक्रम ◀◀ पान २ वर

# सर्व विभागांनी ३१ मे पूर्वी पावसाळा पूर्वतयारी पूर्ण करावी–जिल्हाधिकारी जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

**सर्व विभागांनी त्यांच्या कक्षेत असलेल्या पावसाळापूर्व कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत तसेच येणाऱ्या पावसाळ्यात नागरिकांसाठी शासन यंत्रणेची सज्जता ठेवून पावसामुळे हानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले.**

येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी सर्व विभागांनी करावयाच्या कामांचा आढावा जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांची




यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी पूर्व तयारी बाबत माहिती दिली. जनजागृती करा पावसाळा सुरू होताना जिल्ह्यात अनेक ठिकाणी वीज पडण्याच्या घटना होतात. गावपातळीवर पडणाऱ्या विजेपासून बचाव करण्याच्या उपायांबाबत जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पातळीवर ग्रामसभामधून याबाबत माहिती देणे तसेच गावा-गावात जनजागृती पर संदेश लावणे, भिंतीपत्रके या माध्यमातून लोकांना माहिती देता येईल असे ते म्हणाले. जिल्ह्यात ३०६ गावे नदी काठावर वसलेली आहेत तथापि गेवराई तालुक्यातील ३२, माजलगाव तालुक्यातील २६ आणि परळी वैद्यनाथ तालुक्यातील ५गावांना नदीच्या पुराचा धोका आहे. बीड शहरात देखील सन २००६ आणि सन २०१६ मध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. या सर्व गावात आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत देण्यात आलेले बचाव साहित्य सुस्थितीत असल्याबाबत ◀◀ पान २ वर

# अखंड नामजप सप्ताहाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने करून सारूळकरांनी दाखवले देशप्रेम

**सारूळ । प्रतिनिधी**

**येथील हानुमान मंदिरात सुरू झालेल्या अखंड नामजप सप्ताहाची सुरुवात अत्यंत भक्तिमय वातावरणात झाली. विशेष म्हणजे, या सप्ताहाची सुरुवात राष्ट्रगीत 'जन गण मन' व महाराष्ट्र राज्यगीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' याच्या सामूहिक गानाने करण्यात आली. या उपक्रमातून सारूळ गावाने देशभक्तीचे व सांस्कृतिक जागृतीचे सुंदर उदाहरण घालून दिले.**



या प्रसंगी गावातील सर्व वयोगटातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. उपस्थित ग्रामस्थांनी राष्ट्रगीत व राज्यगीत गाताना हृदयातून देशप्रेम व्यक्त केलं. या आगळ्या-वेगळ्या उपक्रमातून देशप्रेम, सामाजिक ऐक्य आणि धार्मिक श्रद्धा यांचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. सप्ताहाच्या आयोजकांनी सांगितले की, अखंड नामजप सप्ताह हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजामध्ये अध्यात्मासोबतच राष्ट्रीय भावनाही रुजविणारा उपक्रम आहे. देशप्रेमाची भावना बाळगूनच अध्यात्मिक वाटचाल करण्याचा संदेश या उद्घाटनाने दिला आहे. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांपासून ◀◀ पान २ वर

# व्यापाऱ्यांनी साठेबाजी न करता शेतकऱ्यांना रास्तभावात बियाणे खते उपलब्ध करून द्यावी–आ.लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

शेतकऱ्याच्या पेरणीचे दिवस जवळ आले असून, खरिपाच्या पेरण्या आणि तोंडावर येऊन ठेपल्या आहेत अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांची बी बियाणे खते खरेदीसाठी लगबग सुरू होत असून, त्यांना रास्त भावांमध्ये बी बियाणे खते उपलब्ध झाली पाहिजेत यासाठी कृषी विभागाने काम करावे असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते परतूर येथे कृषी विभागाने आयोजित केलेल्या खरीप पूर्व हंगाम बैठकी प्रसंगी बोलत होते.



भेसायुक्त बी बियाणे लिंकिंग करणे असे प्रकार कटाक्षाने कसे टाळता येतील यासाठी लक्ष देऊन कृषी विभागाने सतर्क रहावे, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या डीलर सब डीलर यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा यावेळी त्यांनी बैठकीदरम्यान दिला. ब शेतकरी आपल्या घरातील तुडुक मिळून विकून बी बियाणे खते औषधे खरेदी करत असतो मात्र नफेखोरीच्या नादामध्ये अनेक वेळा शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते त्यामुळे याबाबतीत आपण स्वतः गंभीर असून कृषी विभागानेही गंभीरतेने शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी केले. दरवर्षी शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी बँका नको त्या जाचकाठी घालत असतात विनाकारण शेतकऱ्यांना त्रास होईल अशा प्रकारची वर्तणूक बँकांनी न करता शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज कसे उपलब्ध करून देता येईल या साठी शाखा व्यवस्थापकांनी लक्ष देण्याचे आवाहन केले पुढे ते म्हणाले की उद्दिष्टापेक्षा कमी कर्ज वितरित ◀◀ पान २ वर

# आदर्श मुख्याध्यापिका अनिता उत्तमराव जोगदंड यांचा सेवापूर्ती कार्यक्रम उत्साहात साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

शिक्षक नेते उत्तमराव जोगदंड यांच्या पत्नी अनिताताई जोगदंड मुख्याध्यापक म्हणून यशस्वी काम केल्यानंतर निवृत्त झाल्या असून आता त्यांच्यावर समाजाची जबाबदारी असून त्यांनी घरी बसून न राहता सामाजिक कार्यात आपले योगदान द्यावे असे प्रतिपादन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे यांनी केले ते अनिता ताई उत्तमराव जोगदंड यांच्या सेवानिवृत्तीनंतर आयोजित





निरोप समारंभ सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

जोगदंड दांपत्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले शिक्षण व त्यापुढे शिक्षकाची नोकरी यशस्वीपणे पार केली आहे. जोगदंड ताई यांनी ३८ वर्ष सेवा दिली आहे, हे आदर्श शिक्षक पती-पत्नी यांनी आपल्या मुलांनाही चांगले संस्कार देऊन त्यांनाही शिक्षकच केले आहे त्यांच्या दोन मुली शिक्षक असून दोन्ही जावईही शिक्षक आहेत तसेच मुलगा प्रदीप जोगदंड हाही माध्यमिक शिक्षक आहे. असे कुटुंब फार कमी प्रमाणात असतात नोकरी करीत असताना त्यांनी समाजासाठीही आपले योगदान दिलेले आहे. प्रत्येक सामाजिक कार्यात ते अग्रक्रमाने सहभागी असतात .तसेच छत्रपती सहकारी ◀◀ पान २ वर

# पिंपरी (घाट) येथे भोजनातून विषबाधा ५० जण स्वाराती रूग्णालयात दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यातील पिंपरी (घाट) गावात नगर भोजनाच्या कार्यक्रमानंतर सुमारे ५० जणांना विषबाधा झाली असून त्यांना तातडीने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रूग्णालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.**



प्राथमिक माहितीनुसार, बुधवारी रात्री गावात नगर भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर पहाटेपासून अनेकांना उलट्या, मळमळ, पोटदुखी अशा ◀◀ पान २ वर

# दुसऱ्या व चौथ्या तालुकास्तर सस्ती अदालतीचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

विभागीय आयुक्त यांच्या परिपत्रकानुसार मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यातील विभागीय आयुक्त कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश तक्रारी या शेतरस्ते, पाणंद रस्ते यावरील अतिक्रमाणाबाबत असल्याचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या निदर्शनास आले होते. त्यानुसार विभागातील सर्व संबंधित नागरिकांना विभागीय आयुक्त यांच्याशी थेट संवाद साधण्यासाठी वेबिनारद्वारे संवाद साधला. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभाग व शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करुन देण्याची मागणी केली. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी, मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या रस्त्यांची प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढणेबाबत निर्देशाच्या अनुषंगाने विभागात शेतरस्ते/पाणंद रस्ते अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही ◀◀ पान २ वर

# इंडिया डिझाइन वीक साठी भक्ती लोणीकरची निवड

**जालना । प्रतिनिधी**



परतुरचे आ.बबनराव लोणीकर यांची सुपुत्री भक्ती बबनराव लोणीकर यांनी इटलीतील मिलान येथील प्रतिष्ठित इन्स्टिट्यूटो मरांगोनी मध्ये प्रथम क्रमांक मिळवून आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या कठोर परिश्रम आणि अनोख्या डिझाइन दृष्टिकोनाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. याशिवाय, भक्ती यांनी डिझाइन केलेले एक खास उत्पादन भारतातील सर्वात मोठ्या डिझाइन इव्हेंटपैकी एक असलेल्या इंडिया डिझाइन वीक २०२५ साठी निवडले गेले आहे. या दुहेरी यशामुळे भक्ती बबनराव लोणीकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या कामगिरीने महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. इंडिया डिझाइन वीक हे भारतातील नवोदित आणि अनुभवी डिझायनर्ससाठी एक अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ आहे, जिथे नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील उत्पादने जगासमोर सादर केली जातात. भक्ती बबनराव लोणीकर हिच्या डिझाइनची या प्रतिष्ठित सोहळ्यासाठी निवड होणे, हे तिच्या सर्जनशीलता आणि डिझाइनमधील अप्रतिम कौशल्याचा पुरावा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण घेऊन भारतात आपल्या डिझाइनची ओळख करून देणे, ही भक्ती बबनराव लोणीकर हिची मोठी उपलब्धी आहे. 'डिझाइन वीक २०२५' मध्ये तिच्या उत्पादनाला कसा प्रतिसाद मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भक्तीच्या या यशस्वी वाटचालीसाठी आणि तिच्या उज्वल भविष्यासाठी जालना जिल्ह्यातील हजारो नागरिक शुभेच्छा देत आहेत.

इन्स्टिट्यूटो मरांगोनी हे इटलीतील मिलान शहरात स्थापित, फॅशन, डिझाइन आणि कला क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त शिक्षण संस्था आहे. १९३५ मध्ये ज्युलिओ मरांगोनी यांनी स्थापन केलेली ही संस्था आज फॅशन आणि डिझाइन शिक्षणातील अग्रगण्य नावांपैकी एक आहे. या संस्थेची शाखा मिलान, फ्लॉरेन्स, पॅरिस, लंडन, दुबई, मुंबई आणि शांघाय यासह अनेक जागतिक शहरांमध्ये आहेत. इन्स्टिट्यूटो मरांगोनी फॅशन डिझाइन, फॅशन बिझनेस, फॅशन स्टायलिंग, इंटिरिअर डिझाइन, ◀◀ पान २ वर

# केज तालुक्यातील ६०टक्के शेतकरी पिक विम्यापासून वंचित

## शेतकऱ्यांना सरसकट पिकविमा देण्याची मागणी

**सारणी । प्रतिनिधी**

**केज तालुक्यात २०२४ मधील खरीप हंगामात सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीने प्रत्येक शेतकऱ्यांच्या सोयाबीन कापूस या पिकांसह इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असतानाही काही शेतकऱ्यांना त्यावेळी झालेल्या पीक नुकसानीची विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार अर्ज सादर करता न आलेल्या तब्बल ६० टक्के शेतकरी या पीक विम्या पासून वंचित असून सरसकट पीक विम्याची रक्कम देण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.**

कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटांमुळे दरवर्षी शेतकरी नुकसान सोसत असून प्रत्येक वेळी त्याच्या पदरी निराशाच येते आहे.या स्थितीतून शेतकऱ्यांना आर्थिक हातभार लावण्यासाठी त्यांच्या पिकाला आर्थिक संरक्षण देण्या साठी प्रधानमंत्री पीकविमा योजना सुरू करण्यात आली.मात्र, योग्यवेळी व नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळत नसल्याने योजनेचा हेतू साध्य होताना दिसत नाही.खरीप २०२४ मध्ये पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत केज तालुक्यातील शेतकऱ्यांनी २ लाख २२ हजार ६९० पीक विमा अर्ज दाखल करत १ लाख १० हजार ३६५ हेक्टर जमीनीवरील पिकविमा संरक्षित केला.सर्वाधिक विमा हा सोयाबीन पिकावर उतरण्यात आला होता. गतवर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले. त्या नुकसानीची ऑनलाइन तक्रारअर्ज विमा कंपनी कडे केलेले ९० हजार २८ अर्ज विमा भरपाई साठी पात्र ठरले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांचे अर्ज विविध कारणांमुळे फेटाळण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. केज तालुक्यातील पीक नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना ४१कोटी ५९ लाख ६० हजार ६८८ रुपयांची विमा रक्कम मिळणार आहे.तसेच पीक नुकसान भरपाईस पात्र ठरलेले बहुतांश शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा झाल्याचेही शेतकरी सांगत आहेत.विमा लाभधारक शेतकरी समाधान व्यक्त करत असले तरी केज तालुक्यातील निम्म्या पेक्षा जास्त शेतकरी अद्यापही विम्याच्या प्रतीक्षेत आहेत.पीक विम्याच्या गंभीर प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देऊन राहिलेल्या ६० टक्के शेतकऱ्यांना पीक विमा मिळवून द्यावा अशी मागणीही शेतकऱ्यातून होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार, दि.९ मे २०२५ । पान ७

# एकीकडे पाणी बंद, दुसरीकडे नासाडी; स्मार्ट पुण्यातील रणरणत्या उन्हाळ्यातील चित्र

**पुणे । प्रतिनिधी**

**शहरामध्ये पाणी टंचाईमुळे एखाद्या मोठ्या भागात एक दिवस संपूर्णपणे पाणी पुरवठा बंद केला पाणीपुरवठा तर दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये किंवा नळ कोंडाळ्यांवर गळतीमुळे सतत वाहणारे पाणी अशी विषम परिस्थिती दिसून येते. पुणे शहरामध्ये मध्यवर्ती भागामध्ये अनेक स्वच्छता गृहांचे नुतनीकरण करण्यात आले आहे. बेसिनसह नळ बसवण्यात आले आहेत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा स्वच्छतेसाठी वापर होतो.**

संडास आणि मुताऱ्यांमध्ये पूर्वीचा नळजोड आहे. अनेक स्वच्छता गृहांतील नळ तोडण्यात आले आहेत किंवा चोरीस गेले आहेत. त्यामुळे २४ तास पाणी वाहून जाऊन नासाडी होते. भवानी पेठेत बुरुड पुलाजवळील नककोंडाळ्यातून पाणी वाया जाताना मंगळवारी दिसून आले. अनेक सार्वजनिक मंडळे आणि छोटी देवळे याठिकाणी नळांची खैरात करण्यात आली होती. काही व्यावसायिकांनी चोरून पाणी जोड घेतले आहेत. अशा ठिकाणी पथारीवाले, स्टॉलवाले किंवा छोटे पाणी भरून नेताना दिसतात. सदाशिव पेठेतील खुन्या मुरलीधर जवळ हे चित्र आहे. दरम्यान, मैलापाणी शुध्दीकरण केलेल्या किंवा बोअरच्या पाण्याचा वापर स्वच्छता गृहांत करण्याचा अनेक वर्षांपूर्वीचा प्रायोगिक




तत्त्वावरील प्रयत्न फसला असून बेहिशोबी पाणी नाश होतो आहे. आमदार भीमराव तापकीर यांच्या समवेत माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांनी आज पुणे महापालिका येथे पालिका आयुक्तांची भेट घेतली. दक्षिण पुणे भागात अचानकपणे लादण्यात आलेल्या या अन्यायकारक पाणी कपात निर्णयामुळे परिसरातील नागरिकांना, विशेषतः गृहिणींना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागणार असल्याने याबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा ही भूमिका तापकीर यांनी मांडली. वाढत्या उन्हामुळे शहरात पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे शहरातील नागरिक त्रासले आहेत. अनेक भागात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने माजी नगरसेवक तसेच राजकीय नेते थेट तक्रारी घेत तसेच स्थानिक नागरिकांसह पाणीपुरवठा विभागावर मोर्चा घेवून जात आहेत. त्यावर पाणीपुरवठा सुरळीत केला जात असून वाढीव २ एमएलडी पाण्याचा पुरवठा सुरु केला जात आहे, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले. कमी दाबाने पाणी येत आहे, उशिरा पाणी येत आहे, जलवाहिनी फुटली आहे, वॉलमन पाणी कमी दाबाने सोडतो, अशा प्रकारांच्या तक्रारी देणारे फोन दररोज महापालिकेत येत आहेत. तक्रार देवूनही तसेच पाठपुरावा करुन देखिल पाणी येत नसल्याने थेट पाणीपुरवठा विभागात येवून प्रमुखांना घेराव घातला जात आहे.

## तळेगाव ढमढेरे–शिक्रापूर रस्त्यावर भरधाव कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**तळेगाव ढमढेरे । प्रतिनिधी**

**शिक्रापूर–चाकण रस्त्यावर एका कंटेनरने २० हून अधिक वाहनांचा अपघात केल्याची घटना ताजी असताना तळेगाव ढमढेरे–शिक्रापूर रस्त्यावर तळेगाव ढमढेरे येथे भरधाव व बेधुंदावस्थेत आलेल्या कंटेनरचालकाने दोन दुचाकींना धडक दिली. या अपघातात एका ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला.**

दिलीप सुभाष खोचरे ऊर्फ खोचरे मामा (वय ६८, रा. बजरंगवाडी शिक्रापूर, ता. शिरूर) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठाचे नाव आहे, तर हनुमंत संभाजी भुजबळ (वय ३७) व अश्विनी हनुमंत भुजबळ (वय ३३, दोघेही रा. माळीमळा तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर) हे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी श्रीराम बाबूराव सांगळे (रा. दत्तनगर पाटस, ता. दौंड) या मद्यधुंद अवस्थेतील कंटेनरचालकावर गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्याला अटक केली. याबाबत हनुमंत संभाजी भुजबळ (वय ३७, रा. माळीमळा तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर) यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथे हनुमंत




भुजबळ हे त्यांच्या पत्नीसह दुचाकीने (एमएच १२ आरडी ९४९७) शिक्रापूरकडे येत असताना पाठीमागून भरधाव आलेल्या कंटेनर (एमएच ४२ बीई ९८६९)ने भुजबळ यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यानंतर या कंटेनरने समोरील आणखी एका दुचाकीला (एमएच १२ जेआर ६२२४) देखील जोरात धडक देऊन हा कंटेनर भरधाव तसाच पुढे गेला. पुढे एका फुलांच्या दुकानात कंटेनर शिरत असताना नागरिकांनी त्या कंटेनरचालकाला अडवत येथे उपस्थित कृष्णा गंभिरे या युवकाने शिताफीने कंटेनरची चावी काढून घेतली. घटनेची माहिती मिळताच पोलिस हवालदार किशोर तेलंग, अमोल चव्हाण, संदीप कारंडे, पोलिस जवान ललित चक्रनारायण, योगेश आव्हाड यांनी घटनास्थळी धाव घेतली व संतप्त जमावातून कंटेनरचालकाला ताब्यात घेतले. पोलिसांनी कंटेनरचालकावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. तळेगाव ढमढेरे येथे ज्या ठिकाणी अपघात झाला, तेथे महाविद्यालय असून, परिसरात अनेक विद्यार्थी असतात. मात्र, नुकत्याच शाळा व महाविद्यालयांना सुट्या लागल्याने येथे गर्दी नसल्याने मोठा अनर्थ टळला.

## कंटेनर चालकाने दोन दुचाक्या चिरडल्या; एकाचा मृत्यू

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

**शिक्रापूर–चाकण रस्त्यावर एका कंटेनरने वीसहून अधिक वाहनांना धडक दिल्याची तीन महिन्यांपूर्वीची घटना ताजी असतानाच मंगळवारी (ता. ६) सायंकाळच्या सुमारास तळेगाव ढमढेरे गावाजवळ बेधुंद अवस्थेत असलेल्या कंटेनर चालकाने दोन दुचाकींना धडक दिल्याने झालेल्या अपघातात शिक्रापूर (ता. शिरूर) येथील दिलीप सुभाष खोचरे (वय ६८) या ज्येष्ठाचा मृत्यू झाला.**

याबाबत शिक्रापूर पोलिसांनी माहिती दिली की, तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील हनुमंत भुजबळ हे पत्नीसह दुचाकीवरून (क्र. एम.एच. १२ आर.डी. ९४९७) तळेगावहून शिक्रापूरच्या दिशेने येत होते. त्यावेळी तळेगाव ढमढेरे गावाजवळ मागून भरधाव आलेला कंटेनर (क्र. एम.एच. ४२




बी.ई. ९८६९) त्यांच्या दुचाकीला धडकून समोरील दुसऱ्या दुचाकीलाही (क्र. एम.एच. १२ जे.आर. ६२२४) जोरात धडक देत पुढे एका फुलांच्या दुकानात जात होता. त्यावेळी कृष्णा गंभिरे या युवकाने मोठ्या शिताफीने कंटेनरची चावी काढून घेऊन चालकाला अडविले. या घटनेची माहिती मिळताच पोलिस हवालदार किशोर तेलंग, अमोल चव्हाण, संदीप कारंडे, पोलिस शिपाई ललित चक्रनारायण, योगेश आव्हाड यांनी घटनास्थळी धाव घेत संतप्त जमावातून कंटेनर चालकाला ताब्यात घेतले. या भीषण अपघातात हनुमंत संभाजी भुजबळ (वय ३७) व अश्विनी हनुमंत भुजबळ (वय ३३, दोघेही रा. माळीमळा, तळेगाव ढमढेरे) हे गंभीर जखमी झाले, तर दिलीप सुभाष खोचरे उर्फ खोचरे मामा (वय ६८, रा. बजरंगवाडी, शिक्रापूर) यांचा जागेवरच मृत्यू झाला. याबाबत हनुमंत भुजबळ यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी चालक श्रीराम सांगळे (वय ४२, रा. दत्तनगर, पाटस, ता. दौंड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. या अपघातातील मृत दिलीप खोचरे यांनी वीस– बावीस वर्षांपूर्वी २० लिटरच्या जारने फिल्टर पाणी द्यायला सुरवात केली होती. पोलिस ठाण्यासह सर्व शासकीय कार्यालये, शाळा, बँका येथे अजूनही खोचरे पाणी देत होते. त्यामुळे त्यांना अनेकजण 'पाणीवाले खोचरे मामा' म्हणत. मात्र, या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण शिक्रापूरकरांना याचे दु:ख झाल्याची प्रतिक्रिया सरपंच रमेश गडदे यांनी व्यक्त केली.

## सणसवाडीत दोन रानगव्यांमुळे ग्रामस्थांची पळापळ

**सणसवाडी । प्रतिनिधी**

**उद्योगनगरी सणसवाडीत (ता.शिरूर) बुधवारी (ता.७) दोन रानगवे लोकवस्तीत घुसले. यामुळे ग्रामस्थांना चांगलीच पळापळ करावी लागली. वनविभागाला याबाबत त्वरित कळविल्याने पुणे–अहिल्यानगर महामार्गावरील वाहतूक थांबविण्यात आली. पोलिस व वनविभागाच्या अधिकाऱ्यांना हे गवे पुन्हा वनविभाग क्षेत्रात हुसकून लावण्यात यश आले.**

सणसवाडी (ता.शिरूर) येथे सोमवारी (ता.५) दोन भलेमोठे रानगवे आढळून आले. काही वेळ नागरीवस्तीत त्यांचा विहार राहिल्यानंतर ते पुन्हा गायब झाले. मात्र, बुधवारी (ता.७) पुन्हा सकाळच्याच सुमारास अचानकपणे थेट पुणे–अहिल्यानगर महामार्गालगतच्या नागरी वस्तीतच ते फिरू लागल्याने स्थानिकांमध्ये एकच खळबळ उडाली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे गव्यांना पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी केली. गर्दीच्या गोंगाटामुळे दोन्ही रानगवे घाबरून सैरभैर होऊन पळू लागले. यामुळे नागरिकांचीही पळापळ झाली. याबाबत स्थानिकांनी शिक्रापूर पोलिसांना तसेच शिरूर वनविभागाला सदर माहिती देताच वन परिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे, वनपाल गौरी



हिंगणे, वनरक्षक बबन दहातोंडे, वनमजूर आनंदा हरगुडे, वनविभाग रेस्क्यू टीम मेंबर व निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, अमोल कुसाळकर, शुभम वाघ, नेचर गार्ड ऑर्गनायझेशन संस्थेचे अध्यक्ष गणेश टिळेकर, शुभांगी टिळेकर, बाळासाहेब मोरे, वैभव निकाळजे, श्रीकांत भाडळे, राहुल गायकवाड यांनी एकत्रितपणे रानगवे असलेल्या परिसरात तातडीने धाव घेतली. यावेळी पोलिस हवालदार उद्धव भालेराव, दामोदर होळकर, वॉर्डन बाळासाहेब शेलार यांच्यासह स्थानिकांच्या मदतीने पुणे–अहिल्यानगर महामार्गावरील वाहतूक काही काळ थांबविण्यात आली. नागरी वस्तीतील दोन्ही रानगवे जवळच असलेल्या गवे वनविभागाच्या जंगली भागात नेण्यात सर्वांना यश आले.

## निवृत्त आयपीएस अधिकाऱ्याची ५० लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

**पन्नास लाख रुपयांच्या गुंतवणूकीवर प्रत्येक महिन्याला साडेचार लाख रुपये परतावा देण्याचे आमिष दाखवत एका निवृत्त आयपीएस अधिकार्यांना दोघांनी गंडा घातला. त्यासोबतच आणखी एका गुंतवणूकदाराला तब्बल दीड कोटींचा गंडा घातला आहे. ही घटना गुरूवारी (दि.८) उघडकीस आली.**

याप्रकरणी, डेक्कन पोलिस ठाण्यात मारूती शंकरराव महेशगौरी (वय ८०, रा. विशालनगर, वाकड) यांनी दिलेल्या फिर्यादावरून राजीव अशोक केंद्रे (सध्या रा. दुबई, मुळ गाव जळकोट, जि. लातूर) आणि हर्षल अशोक कुलकर्णी (रा. कोथरूड) या दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेशगौरी हे निवृत्त आयपीएस अधिकारी आहेत. आरोपी केंद्रे आणि कुलकर्णी या दोघांसोबत त्यांचा परिचय भांडारकर रोड येथे एका व्यक्तीच्या माध्यमातून झाला होता. आरोपींनी त्यांची दुबई येथे कंपनी आहे. त्या कंपनीत गुंतवणूक केल्यास दर महिन्याला साडेचार लाखांचा परतावा देण्याचे आमिष महेशगौरी यांना दाखविले. २०२१ ते २०२३ या दरम्यान महेशगौरी यांच्याकडून आरोपींनी ५० लाख रुपये उकळले. मात्र, कोणताही परतावा न देता सर्व रकमेचा अपहार केला. तसेच, फिर्यादी महेशगौरी यांच्यासोबतच आणखी एका गुंतवणूकदाराची आरोपींनी तब्बल दीड कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली. याबाबत महेशगौरी यांनी नुकतीच डेक्कन पोलिसांत फिर्याद दिली आहे. आरोपी राजीव केंद्रे याच्यावर यापूर्वी देखील वाकड आणि हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. डेक्कन पोलीस तपास करीत आहेत.

## दारु पिताना वाद; एकावर धारदार शस्त्राने वार करत केला खूनाचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

**दारु पिताना दोन गटात झालेल्या वादातून एकावर धारदार शस्त्राने वार करत खूनाचा प्रयत्न करण्यात आला. यानंतर आजूबाजूच्या नागरिकांना शस्त्राचा धाक दाखवत धमकावण्यात आले. ही घटना आंबेगाव येथील एका आमराईत घडली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी ओमकार वडमारे (धायरी) याने दिलेल्या तक्रारीनूसार गणेश कदम, अनिकेत सांडे, ऋषी सावंत आणि पुनित वाघामरे (सर्व रा. भारती विद्यापीठ) यांच्यावर खूनाच्या प्रयत्नाचा आणि दहशत माजविण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत अलोक कोंढरे गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, फिर्यादी




ओमकार हा डिलेव्हरी बॉयचे काम करतो, तो दुपारी मित्र अलोक कोंढरे, किरण घोडके, सोमनाथ जगदाळे व इतर काही मित्रांसोबत दारु पिण्यास बसले होते. यावेळी त्यांच्या शेजारी आरोपी येऊन दारु पित बसले. यावेळी अलोक कोंढरे आणि आरोपी गणेश कदम यांच्यात शाब्दिक वादावादी झाली. यानंतर गणेश कदम तेथून निघुन गेला. मात्र थोड्या वेळानंतर तो साथीदारांसह तेथे आला. त्याने अलोक कदमचा पाठलाग करून आंबेगाव घबाडी येथील उत्कर्ष शाळेजवळ त्याला गाठले. आरोपी गणेशने कोयत्याने तर ऋषीकेशने तलवारीने त्याच्यावर वार केले. यानंतर जाताना नागरिकांना शस्त्रे दाखवत दमदाटी केली. तेथे उभी असलेली एक इको कारही फोडण्यात आली. याप्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक मिथुन परदेशी करत आहेत.

## १८ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून महिलेची करोडो रुपयांची फसवणूक; तिघांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

**गुंतवणूकीवर १८ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून एका महिलेची एक कोटी चार लाख २५ हजाराची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी पती –पत्नीसह तिघांवर बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याप्रकरणी पिंपळे निलख येथे रहाणाऱ्या एका महिलेने तक्रार दिली आहे. त्यानूसार शिवाजी शिंदे (डिएसके विद्यानगरी, सुस पाषाण), प्रियांका शिंदे (रा.धानोर, आष्टी) आणि मधुरा रोहन नंदुर्गी( ३६,रा.वाकड ) यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता ३१६, ३१८(४) आणि ३(५) या कलमांनुसार गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, फिर्यादी महिलेस आरोपींनी त्यांच्या स्क्रिसपिका अकॅडमी सर्व्हिसेस प्रा. लि. आणि पीएससीआय टेक या कंपण्यांमध्ये गुंतवणूक केल्यास १८ टक्के परतावा




मिळेल असे सांगितले होते. त्यानूसार त्यांनी १ कोटी २४ लाख ४४ हजार रुपये ऑनलाईन आणि रोख स्वरुपात दिले. तसेच १३ तोळे सोन्याचे दागिने विकून ६ लाख १४ हजार आणि ६० हजाराचा डेल कंपनीचा लॅपटॉप असे १ कोटी ३१ लाख ८८ हजार रुपये गुंतवले. त्याच्या मोबदल्यात २७ लाख ६३ हजार रुपये परतावा म्हणून देण्यात आले. उर्वरीत मोबदला आणि गुंतवणूक केलेली रक्कम न देता १ कोटी चार लाख २५ हजाराची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक रुपेश चाळके करत आहेत.

## ओतूरमध्ये दोन बांगलादेशींना अटक

**ओतूर । प्रतिनिधी**

**बनावट कागदपत्रांचा वापर करून ओतूर (ता. जुन्नर) येथे बेकायदा वास्तव्य करणाऱ्या दोन बांगलादेशी नागरिकांना दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) ताब्यात घेतले. बुधवारी रात्री कारवाई करून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.**

ताजमीर मोशताफा अन्सारी (वय २८), मोहम्मद अलिमूल गुलाम अन्सारी (वय २७, रा. ओतूर, मूळ रा. बोकराई, जि. शारखीरा, बांगलादेश) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस कर्मचारी रोहित बोंबले यांनी ओतूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. परकीय नागरिक कायदा १९४६ कलम १४, पारपत्र अधिनियम १९६७ नियम ३ व ६, परकीय नागरिक आदेश १९५० चे कलम ३ (अ) यानुसार दोघांविरुद्ध ओतूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ओतूर येथे दोन बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव करत असल्याची खबर 'एटीएस'ला मिळाली होती. त्यानुसार 'एटीएस'च्या पथकाने तांत्रिक तपासावरून अधिक माहिती मिळविली. त्यानंतर ओतूर पोलिसांच्या मदतीने पहिल्यांदा ताजमीर यास ताब्यात घेतले. पथकाने त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याचा साथीदार मोहम्मद अन्सारी याचीही माहिती पुढे आली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून बनावट भारतीय आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, तसेच मोबाईल, कालबाह्य झालेले बांगलादेशी पासपोर्ट, व्हिसा जप्त केले. दहशतवाद विरोधी पथकाने ताब्यात घेतलेले आरोपी हे मागील पंधरा वर्षांपासून ओतूरमध्ये वास्तव्य करत असल्याचे समोर आले आहे. संबंधित व्यक्ती परिसरात पेंटिंगची कामे करत होते. त्यांना ओतूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांकडून दोघांविरोधात पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. त्यांचा देशात येण्यामागील उद्देशाची चौकशीही केली जात आहे. ही कारवाई दहशतवाद विरोधी पथकाच्या पोलिस निरीक्षक सुजाता तानवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक दत्तात्रेय दराडे, हेड कॉन्स्टेबल शरद जाधव, तांदळवाडे ,तसेच ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक एल. जी. थाटे, पोलिस उपनिरीक्षक संदीप आमने, पोलिस हवालदार दिनेश साबळे, नामदेव बांबळे, महेश पठारे, संदीप लांडे, पालवे, संतोष भोसले, किशोर बर्डे, ज्योतिराम पवार, विशाल गोडसे यांच्या पथकाने केली. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक थाटे करत आहेत.

# खांडजमधील त्या खूनाचा माळेगाव पोलिसांकडून छडा

### दोघा आरोपींना केली अटक, महिलेकडे शरीरसुखाची मागणी केल्याने केला खून

**बारामती । प्रतिनिधी**

**खांडज (ता. बारामती) येथील राऊतवस्ती येथे मारुती साहेबराव रोमण (वय ५८) यांचा खून करत त्यांचा मृतदेह एका विहिरीत टाकण्यात आल्याची घटना उघडकीस आली होती. या खून प्रकरणाचा माळेगाव बुद्रूक पोलिसांनी छडा लावला. या प्रकरणी नवनाथ शिवाजी घोगरे (वय २५, मूळ रा. कार्लेभाजे, लोणावळा, ता. मावळ) व अनिल गोविंद जाधव (वय ३५, रा. आंबेवाडी, ता. रोहा, जि. रायगड) अशी पोलिसांनी अटक केलेल्यांची नावे आहेत.**

मारुती रोमण यांच्यावर कोणत्या तरी टणक वस्तूने प्रहार करत त्यांचा खून करण्यात आला. मृतदेहाच्या गळ्यामध्ये काळ्या रंगाची साडी बांधत त्यात दगडे बांधून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने हा मृतदेह कांतीलाल सयाजी माने यांच्या विहिरीत टाकला गेल्याचे उघड झाले होते. हा मृत्यू संशयास्पद असल्याने पोलिसांनी लागलीच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय तपासणी व शवविच्छेदनासाठी हा मृतदेह बारामतीच्या उपजिल्हा रुग्णालयात नेला. शवविच्छेदन अहवालानुसार टणक वस्तूने प्रहार केल्याने हा खून झाल्याचे समोर आले. त्यानुसार माळेगावचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन लोखंडे यांनी गुन्हे शोध पथक व पोलिस अंमलदारांची दोन पथके तयार करत तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान मारुती रोमण यांचे कुटुंबात किंवा बाहेर कोणाशी वाद झाले होते का, मयत व्यक्तिला अखेरचे कोणी पाहिले अशी माहिती काढण्यात आली. त्यात मजूर कामासाठी आलेल्या दोघांसोबत मारुती रोमण यांना अखेरचे बघितल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मृतदेह टाकलेल्या विहिरीपासून काही अंतरावर खोपी बांधून राहणाऱ्या घोगरे व जाधव यांच्याकडे पोलिसांची संशयाची सुई वळाली. या दोघांकडेही पोलिसांनी कसून चौकशीला सुरुवात केली. परंतु या दोघांनीही आम्ही रोमण यांना ओळखत नसल्याचे सांगत उडवाउडवीची उत्तरे दिली. इतर मजूर महिलांकडे महिला पोलिसांनी चौकशी केली असता पुरुष व महिला मजूर यांच्या माहितीमध्ये विसंगती दिसून आली. त्यामुळे हे दोघे काही तरी लपवत असल्याचा दाट संशय पोलिसांना आला. त्यामुळे या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेत सखोल चौकशी सुरु केली. या चौकशीत मयत मारुती रोमण यांनी घोगरे याच्या नातलग महिलेकडे शरीरसुखाची मागणी केली होती. ही बाब महिलेने या दोघांना सांगितली होती. त्यातून घोगरे याने जाधव याच्या साथीने रोमण यांना बोलावून घेत त्यांच्याशी गोड बोलून निर्जनस्थळी नेले. तेथे डोक्यात दगड घालून खून केला. मयताची ओळख पटू नये यासाठी त्यांची कपडे काढून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने ती जाळण्यात आली. मृतदेह काही काळ ऊसाच्या शेतात लपवून नंतर रात्रीच्या सुमारास अंधारात विहिरीत टाकण्यात आला. विहिरीतून तो लवकर वर येवू नये यासाठी मृतदेहाचे हातपाय साडीने बांधून त्यात मोठमोठी दगडे टाकण्यात आल्याची या दोघांनी कबुली दिली. ही कामगिरी पोलिस अधिक्षक पंकज देशमुख, अप्पर अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन लोखंडे, उपनिरीक्षक देवीदास साळवे, अमोल खटावकर, तुषार भोर, सहा. उपनिरीक्षक संजय मोहिते, हवालदार सादीक सय्यद, राहूल पांढरे, विजय वाघमोडे, रुपाली धीवार, ज्ञानेश्वर सानप, ज्ञानेश्वर मोरे, अमोल राऊत, अमोल वाघमारे, अमोल कोकरे, विकास बंडगर, सागर पवार, सुनिता पाटील आदींनी केली.